पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १९५ ■ बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# सुप्रीम कोर्ट आता शुक्रवारी करणार फैसला !

## शिवसेना-राष्ट्रवादी पक्षचिन्हाची सुनावणी पुन्हा लांबणीवर

प्रतिनिधी २१ जानेवारी

**मुंबई:** महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाशी संबंधित शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष आणि चिन्हाच्या वादावरील सर्वोच्च न्यायालयातील महत्त्वाची सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. आज, २१ जानेवारी रोजी सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर या प्रकरणावर सुनावणी होणार होती, मात्र आता ही सुनावणी येत्या शुक्रवारी होणार असल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकरणाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हासंदर्भातील वाद गेल्या तीन वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयापुढे प्रलंबित आहे. २१ जानेवारी रोजी सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी होणार असून, त्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. मात्र, खंडपीठाच्या दैनिक कार्यसूचीत ही याचिका क्रमांक ३७ वर असल्याने प्रत्यक्ष सविस्तर सुनावणी होईल की केवळ पुढील तारीख दिली जाईल, याबाबत कायदेतज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत.

शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्ह वाद गेल्या तीन वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयापुढे आहे. यात २१ जानेवारी रोजी सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे. त्याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. मात्र, खंडपीठाच्या दैनिक कार्यसूचीमध्ये या याचिकेचा क्रमांक ३७ वा असल्याने प्रत्यक्ष सुनावणी बुधवारी पूर्ण होणार की केवळ तारीख मिळणार, याबाबत कायदेतज्ज्ञांमध्ये मतमतांतरे आहेत.

सुप्रीम कोर्टाच्या कामकाजाच्या पद्धतीनुसार, सुरुवातीचे क्रमांक ताज्या प्रकरणांसाठी असतात. म्हणून शिवसेना पक्षाविषयीची याचिका दुपारच्या सत्रात कोर्टासमोर येण्याची शक्यता अधिक आहे. मात्र, आधीच्या ३६ प्रकरणांवर दीर्घ युक्तिवाद झाला, तर शिवसेना याचिकेला पुरेसा वेळ नाही, असे होऊ शकते. तसे झाल्यास सुनावणी पुढील तारखेस ढकलली जाऊ शकते.तथापि, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, खंडपीठ यावर प्राथमिक टिप्पणी करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या निकालाचा परिणाम राजकीय समीकरणांवर व आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर होईल. लोकशाहीच्या संरक्षणासाठी ही सुनावणी तातडीने करावी. विधानसभा अध्यक्षांचा निकाल घटनाबाह्य असल्याने कोर्टाने यात हस्तक्षेप करावा, असे ॲड. असीम सरोदेंचे म्हणणे आहे.

### सुनावणी पूर्ण होण्याची शक्यता धूसरच

आजच्या सुनावणीत प्रामुख्याने दोन शक्यता आहेत. पहिली म्हणजे वेळेअभावी केवळ पुढील सुनावणीची तारीख निश्चित केली जाईल. दुसरी शक्यता म्हणजे कोर्टाने सुनावणीसाठी विशेष वेळ दिला, तर निवडणूक आयोगाच्या निर्णयावर आणि विधानसभा अध्यक्षांच्या निकालावर सविस्तर चर्चा सुरू होऊ शकते.

### निकालानंतर शिंदे, ठाकरेंसमोर नवे आव्हान

प्रकरणात कोर्टाचा निकाल आल्यास व तो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या बाजूने लागल्यास उद्धव ठाकरेंसमोर न्यायालयीन लढाई बाजूला ठेवून पक्षबांधणी करताना संभाव्य गळती रोखावी लागेल. तर निकाल उद्धव यांच्या बाजूने लागल्यास शिंदेंना नवा पक्ष स्थापावा लागेल किंवा भाजपमध्ये विलीन व्हावे लागेल. तसे झाल्यास त्यांचे राजकीय वजन, प्रभाव घटेल. मुंबईतील शिंदेंचे नगरसेवक उद्धव ठाकरेंकडे जातील. मुंबई महापौरपद आणि सत्तेचे गणित शिंदेंच्या हाताबाहेर जाईल, असे राजकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



# श्रीराम गावंडे यांच्यासह दहा आरोपींना जन्मठेप !



## पाच निर्दोष मुक्तता, आज आठ आरोपींना केली गेली अटक!

### किसनराव हुंडीवाले हत्या प्रकरण.....

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अकोला:** किसनराव हुंडीवाले हत्या प्रकरणात दहा आरोपींना जन्मठेपेची शिक्षा अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाने सुनावली आहे. या प्रकरणात राज्य सरकारच्या वतीने विशेष सरकारी वकील उज्वल निकम, ॲड.गिरीश देशपांडे तसेच फिर्यादीकडून ॲड.विनोद फाटे यांनी बाजु लढवली. आज झालेल्या अंतिम सुनावणीत या बहुचर्चित हत्याकांड प्रकरणात श्रीराम गावंडे, रणजीत उर्फ छोटू श्रीराम गावंडे, विक्रम श्रीराम गावंडे, सूरज प्रल्हाद गावंडे, धीरज प्रल्हाद गावंडे, विशाल शंकर तायडे, सतीश सुखदेव तायडे, प्रतीक दत्तात्रय तोंडे, मयूर गणेशलाल अहीर आणि दिनेश बादलसिंग राजपूत यांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणातील दोघे आरोपी रणजीत गावंडे व धीरज प्रल्हाद गावंडे कोठडीत होते. इतर आठ आरोपींना आज पोलिसांनी निकालाच्या सुनावणीनंतर तत्काळ अटक केली आहे.

गवळी समाजाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किशनराव हुंडीवाले हे एका प्रकरणाच्या सुनावणीसाठी ६ मे २०१९ रोजी धर्मदाय आयुक्त कार्यालयात आले होते. दुपारी सुमारे १२ वाजताच्या सुमारास त्यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात एकूण १५ आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास प्रथम तत्कालीन पोलीस निरीक्षक विनोद ठाकरे यांनी केला. त्यानंतर बाळापूर येथील सोहेल शेख, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश माने पाटील तसेच पोलीस निरीक्षक रायटर उमेश पाटील यांनी पुढील तपास करत एक हजारांहून अधिक कागदपत्रांची आरोपपत्र न्यायालयात दाखल केली होती. सुनावणीदरम्यान पाच आरोपींच्या सहभागाबाबत कोणतेही ठोस व विश्वासार्ह पुरावे उपलब्ध नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांच्या विरोधातील आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत. या पार्श्वभूमीवर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी संबंधित आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याची विनंती न्यायालयाकडे केली होती. प्रवीण श्रीराम गावंडे, मंगेश गावंडे, दिपाली गावंडे, नम्रता गावंडे आणि शेख साबीर यांना सबळ पुराव्या अभावी न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे.

# डिडिआर प्रविण लोखंडे सरकारवर भरोसा नाही काय ?

## शासनाच्या आदेशापुर्वीच विभागात झाले रुजु

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अकोला :** अकोल्याचे जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) प्रवीण लोकंडे यांची झालेली मुदतपूर्व आणि नियमबाह्य बदली महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाने (मॅट)ने रद्द ठरवली आहे. राजकीय दबावापोटी आणि 'सिव्हिल सर्व्हिसेस बोर्डा'च्या नावाखाली केवळ औपचारिक प्रक्रिया राबवून केलेली ही बदली न्यायाधीकरणाने गैरहेतुचा ठरवत राज्य सरकारला जोरदार चपराक दिली आहे. या विषयीचा निर्णय १७ जानेवारी रोजी झाला. न्यायालयाने दोन आठवड्यांचा अवधी शासनाला दिला असताना उपनिबंधक म्हणून प्रवीण लोखंडे हे कार्यालयात रुजु झाल्याची धक्कादायक माहिती असून यामुळे शासनाची प्रतिमा मलिन झाली आहे. इतकेच नाही तर सरकारवरचा प्रवीण लोखंडे यांचा अविश्वास स्पष्टपणे अधोरेखित होत आहे. लाच प्रकरणात त्यांच्यावर कारवाई झाली असताना त्यांची अकोल्यातच पुन्हा नियुक्ती करण्यामागे हेतु काय असा प्रश्न उपस्थित होतो. अकोल्यात ज्वाईन होण्यामागे काय हेतु आहे अशी विचारणा आता सुरु झाली आहे. दरम्यान, या विषयी आमच्या प्रतिनिधीने सहकार विभागात प्रविण लोखंडे यांची भेट घेण्याचा प्रयत्ने केला असता त्याची भेट सकाळी झाली नाही. प्रवीण लोकंडे यांनी ७ मार्च २०२४ रोजी अकोला येथे जिल्हा उपनिबंधक म्हणून पदभार स्वीकारला होता.

# विनोद तावडे जिवाचं रान करतील, पण पंतप्रधान मोदींचा विश्वास सार्थ ठरविणे कठीण

वृत्तसंस्था २१ जानेवारी

**नवी दिल्ली :** भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नवीन नबीन यांची काल बिनविरोध निवड झाली. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांना अध्यक्षांच्या खुर्चीवर बसविले. ते आता आपले बॉस असून आपण कार्यकर्ता असल्याचे मोदी नबीन यांना शुभेच्छा देताना म्हणाले होते. यावेळी मोदींनी नबीन यांच्यासमोर आगामी निवडणुकांबाबतही सूचक भाष्य केले होते.



महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आणि प्रामुख्याने मुंबई महापालिकेत भाजपला मिळालेल्या घवघवीत यशाचा उल्लेख मोदींकडून देशभरात केला जात आहे. नव्या अध्यक्षांसमोरही त्यांनी हा उल्लेख केला. त्याचप्रमाणे केरळची राजधानी तिरूवनंतपुरम महापालिकेतही भाजपने ५० जागा मिळवत कमाल केली आहे. मोदींनी त्यावरही भाष्य करत आता केरळ राज्यातही भाजपची सत्ता येईल, असे म्हटले. त्यानंतर काही तासांतच नव्या अध्यक्षांनी पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्याकडे केरळची जबाबदारी सोपविली. केरळमध्ये पुढील काही महिन्यांत विधानसभेची निवडणूक होणार आहे. तावडे यांच्याकडे या निवडणुकीसाठी केरळचे प्रभारी म्हणून जबाबदारी सोपविली आहे. भाजपसाठी केरळ या राज्यात विजय मिळविणे खूप कठीण आहे. हेच कठीण काम तावडे यांच्यावर देण्यात आले आहे. ते बिहारचेही प्रभारी होते. तिथे भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. पण बिहार आणि केरळची तुलना होऊ शकत नाही. दक्षिण भारतातील या राज्यात भाजपची ताकद मागील काही वर्षांत वाढली असली तरी ती सत्तेतपर्यंत घेऊन जाणारी नाही, हे मागील काही निवडणुकांच्या इतिहासावरील दिसेल.

# निवासी भागात बेकायदेशीर हॉस्टेल-अभ्यासिका

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अमरावती :** नागपूर येथील प्रभावशाली व्यक्ती प्रणव कापगते यांच्याकडून अमरावती शहरातील गाडगे नगर परिसरात निवासी भागात बेकायदेशीररीत्या हॉस्टेल व अभ्यासिका सुरू ठेवण्यात आली असून, याबाबत वारंवार तक्रारी करूनही अमरावती महानगरपालिका प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

प्रशासनाच्या भूमिकेविरोधात स्थानिक रहिवासी सुरेश मधुकरराव बोबडे यांनी थेट आत्मदहनाचा इशारा दिल्याने खळबळ उडाली आहे. गाडगे नगर, शान हॉंडा शोरूम मार्ग, गल्ली क्रमांक १ येथील निवासी भागात अनधिकृतपणे हॉस्टेल व अभ्यासिका सुरू असून, त्यामुळे परिसरातील रहिवाशांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात सुरेश मधुकरराव बोबडे यांनी वेळोवेळी मनपा आयुक्त सौम्या मंडल यांच्यासह संबंधित झोन क्रमांक १ चे सह आयुक्त श्री. तिविले व उप अभियंता श्री. अवसरे यांच्याकडे तक्रारी व निवेदने दिली. मात्र, आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी मनपा निवडणुकीवर बहिष्काराबाबत पत्रकार परिषद घेऊनही प्रशासनाने दखल घेतली नाही. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त-२ नाईक मंडल यांनी दि. २७/१२/२०२५ रोजी दिलेल्या सूचनेचे उल्लंघन करूनही संबंधित गैरअर्जदारावर कारवाई करण्यात आली नाही.

# राष्ट्रीय वीरगाथा 5 मध्ये अकोल्याचा डंका !

## राज्यातील 19 विद्यार्थ्यांमध्ये दोन अकोल्याचे....

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अकोला :** 'राष्ट्रीय वीरगाथा ०.५' स्पर्धेत राज्यातील १९ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. त्यात अकोल्याच्या दोन विद्यार्थ्यांचा समावेश असल्याने ही अकोल्यासाठी गौरवाची बाब ठरली असून, राज्यस्तरावर अकोल्याच्या लौकिकात वाढ झाली आहे. या विद्यार्थ्यांना दिल्ली येथे विशेष अतिथी म्हणून प्रजासत्ताकदिनी संचलन पाहता येणार असून, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते प्रत्येकी १० हजार रुपये, प्रमाणपत्र व पदक प्रदान करण्यात येणार आहे.

प्रेरणादायी जीवनकथा विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी, तसेच विद्यार्थ्यांमध्ये नागरी सजगतेची भावना निर्माण करण्यासाठी २०२१पासून राष्ट्रीय वीरगाथा प्रकल्प राबवण्यात येत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, संरक्षण मंत्रालय यांच्यातर्फे सशस्त्र दलातील अधिकाऱ्यांचे शौर्य आणि बलिदानाच्या सन्मानासाठी शौर्य पुरस्कार प्रजासत्ताकदिनी दिले जातात. या स्पर्धेत सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येते. यामध्ये अकोला जिल्ह्यातून श्रीमती राधादेवी गोयनका विद्यामंदिर हायस्कूलची विधी प्रदीप वानखडे वर्ग ते ३ ते ५ गटात निवड झाली आहे. तशीच दुसरी विद्यार्थिनी श्रेया मुकुंद उंबरकर हिने वर्ग ६ ते ८ गटात स्थान पटावले आहेत. ह्या दोन्हींचा प्रजास्ताकदिनी दिल्ली येथे केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे.

यंदा राज्यातील ३ लाख २२ हजार ९१३ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. त्यांपैकी जिल्हा पातळीवरून पाच हजार ५९ प्रवेशिकांची राज्य पातळीवर निवड करण्यात आली. निवड झालेल्या प्रवेशिकांपैकी उत्कृष्ट ४०२ प्रवेशिका राष्ट्रीय स्तरावर पाठवण्यात आल्या. राष्ट्रीय स्तरावरील समितीने १०० सर्वोत्तम प्रवेशिकांची निवड केली असून त्यात विधी व श्रेया यांचा समावेश आहे हे विशेष.





### असे आहेत गटनिहाय यशस्वी विद्यार्थी

**गट तिसरी ते पाचवी**

सांहवी शशांक भिगार्डे (सडवळ) - कविता
वर्धन समीर फलके (कोल्हापूर) - चित्रकला
जान्हवी सचिन खोत (सांगली) परिच्छेद लेखन
वेदिका प्रवीण कवितके (सातारा) परिच्छेद लेखन
विधी प्रदीप वानखडे (अकोला) - चित्रकला
मंजुश्री घोरपडे (अहिल्यानगर) - परिच्छेद लेखन

# भाजप उमेदवाराला एम आय एम -काँग्रेसचा पाठिंबा ? छुप्या युतीची पुन्हा जोरदार चर्चा

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अकोला :** अकोल्याच्या अकोट नगरपरिषदेत भाजपला एमआयएमकडून मिळालेल्या मान्य पाठिंब्यानंतर राज्यभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. विरोधकांनी या मुद्द्यावर भाजपवर टीकास्त्र सोडत, तत्त्वांशी तडजोड केल्याचा आरोप केला होता. या घटनेमुळे भाजपची प्रतिमा अडचणीत आली असतानाच, अकोट प्रकरणाचे पडसाद अद्यापही अकोला जिल्ह्यात जाणवत आहेत. अकोटनंतर प्रथमच नगरपरिषद झालेल्या हिवरखेड नगरपरिषदेतील सभापती व उपसभापती पदाच्या निवडणुका २० जानेवारी रोजी पार पडल्या.

### सुचक काँग्रेसचा अनुमोदक एम आय एम चा

महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती पदासाठी भाजपकडून अनिता रविंद्र वाकोडे, तर शिवसेना गटाकडून शीतल प्रमोद पोके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. भाजपच्या उमेदवारासाठी सूचक म्हणून काँग्रेसच्या नगरसेविका रुबी नाज अब्दुल सलमान, तर अनुमोदक म्हणून एमआयएमचे नगरसेवक आजम खान यांनी सह्या केल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या. या निवडणुकीत अनिता वाकोडे यांना चार मते, तर शीतल पोके यांना एक मत मिळाले. अकोट नगरपरिषदेत मिळालेल्या अप्रत्यक्ष पाठिंब्यानंतर अकोला महानगरपालिकेत भाजपला दहा जागांचा फटका बसल्याची चर्चा असताना, हिवरखेडमधील या घडामोडींवर भाजप काय भूमिका घेते आणि वरिष्ठ नेते काय सल्ला देतात, याकडे आता संपूर्ण अकोला जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

या निवडणुकीत भाजपच्या उपसभापती पदाच्या उमेदवाराला थेट एमआयएम व काँग्रेसच्या नगरसेवकांनी सूचक व अनुमोदक म्हणून पाठिंबा दिला. या घडामोडीमुळे राजकीय वर्तुळात मोठे आश्चर्य व्यक्त केले जात असून, अकोल्यात पुन्हा एकदा छुप्या युतीची चर्चा रंगू लागली आहे. हिवरखेड नगरपरिषदेतील विविध समित्यांच्या सभापती पदांसाठी निवडी झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## मराठी भाषा विद्यापीठाच्या पहिल्या परीक्षेस सुरवात

**अमरावती :** अमरावती येथे कार्यरत देशातील पहिल्या मराठी भाषा विद्यापीठाच्या प्रथम सत्राच्या पहिल्या परीक्षेस सोमवार, दि. १९ जानेवारीपासून सुरूवात झाली आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेनंतरच्या या पहिल्याच परीक्षा असल्याने विद्यार्थी आणि व्यवस्थापनामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

पहिलेच वर्ष असल्याने विद्यापीठाने चार अभ्यासक्रम सुरू केले आहेत. यात कला स्नातक (बी.ए.) भाषा व लिपीशास्त्र, प्रादर्शिक कला स्नातक (बी.पी.ए. नाटक), स्नातकोत्तर मराठी (अभिजात भाषा) आणि स्नातकोत्तर मानसशास्त्र या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विद्यापिठाचे पहिलेच वर्ष असतानाही ४९ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. अभ्यागत प्राध्यापकांच्या सहकार्याने प्रथम सत्राचे वर्ग सुरू करण्यात आले. कालपासून या सर्व चार अभ्यासक्रमांच्या पहिल्या सत्राची परीक्षा सुरळीतपणे सुरू झाली आहे. याचा विद्यापीठातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला.

# पक्षावर ताबा मिळवू पाहणाऱ्यांचे षडयंत्र

## प्रवीण पोटे यांचे राजीनाम्याच्या अफवांवर स्पष्ट भाष्य

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अमरावती :** भारतीय जनता पक्षात सध्या अफवांचे पेव फुटले असून, मंगळवारी दुपारी माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांच्या राजीनाम्याच्या बातम्यांनी सोशल मीडियावर मोठी खळबळ उडवली.काही मिनिटांतच ही अफवा वाऱ्यासारखी पसरली. मात्र, पोटे यांच्या मित्रमंडळींसह कुटुंबीयांनी तात्काळ या वृत्ताचे खंडन केले. भाजपमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत मतभेदांच्या पार्श्वभूमीवर या अफवांकडे पाहिले जात असून, तिकीट वाटप आणि कोअर कमिटीच्या रचनेवरून पक्षातील काही गट सक्रिय झाल्याचे चित्र आहे. पोटे एका आमदार दाम्पत्याचे निकटवर्तीय असल्याचे भासवणाऱ्या पोस्ट्‌मही सोशल मीडियावर फिरत असून, या पार्श्वभूमीवर राजीनाम्याच्या अफवांना अधिकच खतपाणी मिळाले. अफवा व्हायरल होताच यावर स्वतः प्रवीण पोटे यांनी



प्रतिक्रिया देत सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह पक्षाच्या सर्व चरिश नेत्यांवर माझा पूर्ण विश्वास आहे. मी कायम कार्यकर्त्यांना एकत्र ठेवण्याचे आणि त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. पक्षावर ताबा मिळवू इच्छिणारे काही लोक अशा अफवा पसरवत आहेत. मी भाजपचा निष्ठावंत कार्यकर्ता आहे. मी कार्यकर्ता होतो, आहे आणि राहणार, असे ठामपणे सांगत पोटे यांनी राजीनाम्याच्या चर्चांना पूर्णविराम दिला. दरम्यान, भाजपमधील गुरू असलेला अंतर्गत कलह पुन्हा एकदा उघडकीस आला असून, वरिष्ठ पातळीवरून वेळीच हस्तक्षेप होण्याची गरज व्यक्त केली जात आहे. अन्यथा, अशा अफवा आणि अंतर्गत कुरघोड्या पक्षाच्या प्रतिमेला धका पोहोचवू शकतात आणि तळागाळातील तळागाळ कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री व पक्षश्रेष्ठींनी या घडामोडींची दखल घेऊन ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आता भाजप गोटातून व्यक्त होत आहे.

# मटन-रोडग्याच्या सुवासात रंगली बहीरमची ऐतिहासिक यात्रा !

## श्रद्धा, परंपरा आणि संस्कृतीचा संगम; विदर्भाच्या लोकजीवनाशी घट्ट नाळ जोडणारा महाउत्सव

प्रतिनिधी २१ जानेवारी

अमरावती : जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यात सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी महाराष्ट्र व मध्यप्रदेश सीमेवर भरविण्यात येणारी बहीरमची यात्रा ही महाराष्ट्रातीलच नव्हे तर विदर्भातील सर्वात मोठ्या आणि वैशिष्ट्यपूर्ण यात्रांपैकी एक म्हणून ओळखली जाते. ५ डिसेंबर ते ५ फेब्रुवारी अशा दोन महिन्यांच्या कालावधीत चालणाऱ्या या यात्रेला दीड महिना उलटून गेला असतानाही भाविकांची गर्दी, उत्साह आणि आनंद ओसंडून वाहताना दिसत आहे.



श्रद्धा, परंपरा आणि संस्कृतीचा संगम असलेली ही यात्रा विदर्भाच्या लोकजीवनाशी घट्ट नाळ जोडणारी आहे. भैरव बाबा उर्फ बहीरम बाबा म्हणून येथे पूजले जाणारे दैवत पाहण्यासाठी फार पूर्वीपासून मेलघाटातील आदिवासी बांधव धनदाट जंगलात वसलेल्या या स्थळी येत आहेत. काळाच्या ओघात या यात्रेला धार्मिकतेबरोबरच सामाजिक स्वरूप प्राप्त झाले आहे. सुमारे दीड ते दोनशे वर्षांपूर्वी ही यात्रा शेतकऱ्यांची यात्रा म्हणून ओळखली जाऊ लागली. शेतीची कामे आटोपल्यानंतर शेतमाल विकून मिळालेल्या पैशातून शेतकरी बांधव मोठ्या संख्येने या यात्रेत सहभागी होत असत.

शेतीसाठी लागणारी अवजारे, व्यवहार तसेच अनेकांच्या लग्न-जुळवणीचे केंद्र म्हणूनही या यात्रेला महत्त्व प्राप्त झाले आहे. आज बहीरमची यात्रा केवळ अमरावती जिल्ह्यापुरती मर्यादित न राहता संपूर्ण विदर्भासाठी जत्राळू ठरली आहे. मागील काही वर्षांत मराठवाडा व खान्देशातूनही मोठ्या संख्येने भाविक येथे दाखल होत आहेत. लहानपणापासून थोरांपर्यंत सगळ्यांच्याच मेजवानीची ही यात्रा म्हणजे केवळ धार्मिक विधी न राहता कुटुंबीयांसोबत साजरा होणारा आनंदोत्सव बनली आहे.

या यात्रेचे खास आकर्षण म्हणजे मातीच्या हंडीत शिजवलेले मटन. यात्रेच्या परिसरात सुमारे ६० ते ७० हॉटेल्समध्ये हंडीतील मटन शिजवून दिले जाते. अनेक भाविक स्वतः मटन आणून हॉटेलमध्ये शिजवून घेतात, तर काही जण लगतच्या जंगल परिसरात पारंपरिक पद्धतीने हंडीत मटन शिजवून त्याचा आस्वाद घेतात. मटनासोबत गरम रोडे, बटाटे-वांग्याची भाजी यामुळे यात्रेतील मेजवानीला विशेष रंग चढतो. मटनासोबतच रोडे पार्टी करण्यासाठी देखील अनेक जण बहीरम यात्रेत येतात.

श्रद्धा, परंपरा, संस्कृती आणि खाद्यसंस्कृती यांचा अनोखा संगम असलेली बहीरमची यात्रा आजही विदर्भाच्या लोकजीवनाचा अविभाज्य भाग ठरत असून भाविकांच्या प्रचंड प्रतिसादामुळे हा महाउत्सव दिवसेंदिवस अधिक भव्य आणि उत्साही होताना दिसत आहे.

# आता लाडकी बहीण योजनेसाठी आधार प्रमाणीकरण!

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अमरावती :** राज्यातील महिलांच्या आधिक स्वातंत्र्य, तसेच आरोग्य, पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यामाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहोण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभाची महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरण करण्यात मान्यता देण्यात आली आहे. योजनेतील लाभार्थ्यांची १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी करणे आवश्यक होते. ऑनलाईन ई-केवायसी करताना पतीचे किंवा वडिलांचे आधार कार्ड नोंदवून ओटीपी प्राप्त झाल्यानंतर ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण होत होती. परंतु विधवा, परितत्त्या, कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिला, घटस्फोटीत, एकल व ज्यांचे वडील मृत्यू पावले आहेत, अशा महिलांना ई-केवायसी करण्यात अडचण निर्माण होत होती. त्यामुळे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत वाढवून ई-केवायसी प्रक्रिया राबवित असताना लाभार्थ्यांकडून पर्याय निवडताना संभ्रम असल्यामुळे ई-केवायसी करताना चुका झाल्यास किंवा पती किंवा वडील ह्यात नसलेल्या, तसेच घटस्फोटीत लाभार्थांची ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण करण्यासाठी किंवा अद्याप ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण केली



नसल्यास यासाठी एडीट ऑप्शन देण्यात आला होता. १८ नोव्हेबर २०२५ पर्यंत ऑनलाईन ई-केवायसी करताना पर्याय देण्यात आले होते. यात माझ्या कुटुंबातील सदस्य नियमित कायम कर्मचारी माणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नाही किंवा सेवानंतर निवृत्तीवेतन येत नाहीत. पर्याय : होय/नाही, माझ्या कुटुंबातील केवळ एक विवाहीत व एक अविवाहीत महिला योजनेचा लाभ घेत आहे.

# बेघर लोकांसाठी निवारा

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अमरावती :** प्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते जवारीलाल सी जैन रा. मुंबई यांची जे सी जैन चारिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या तर्फे बडनेरा येथील बेघर लोकांसाठी निवारा, आधार केंद्राला एक महिना पुरेल एवढा किराणा खरेदी करण्यासाठी रुपये प्रति माह ३००००/- तीस हजार रुपये अन्न दान करण्याचे जाहीर केले. या निमित्याने एक छोटासा ऋणानुबंधाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे प्रसिद्ध उद्योजक श्री चंद्रकुमार जाजोदिया उर्फ लप्पी भैय्या तसेच अमरावती येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते मा.पंडित देवदत्त शर्मा हे प्रामुख्याने उपस्थित होते यावेळी त्यांनी आधार केंद्रातील बेघर बांधवांची सुश्रुषा करणाऱ्या व्यवस्थापक ज्योती राठोड यांची खूप प्रशंसा केली व आपण सर्व है मानव सेवा ही ईश्वर सेवा करत आहाल असे ते बोलत होते भविष्यात आपणास कुठलीही अडचण आल्यास आम्ही सदैव आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत असे नमूद करण्यात आले तसेच श्री लप्पी भैय्या यांनी आपल्या मनोगत मध्ये सांगितले की मागील पंधरा वर्षापासून मी आपले कार्य बघत असून आपण अतिशय प्रामाणिकपणे या क्षेत्रात कार्यरत आहात. भविष्यात अधिक मोठे मोठे लोक आपण या आधार केंद्राशी जोडू व हे कार्य अतिशय आनंदाने करूया असे मनोगत व्यक्त केले.

## वरुड येथे विभागीय मेळावा

प्रतिनिधी २१ जानेवारी

**वरुड:** एसटी कामगार सेनेच्या वतीने अमरावती विभाग विभागीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते कामगार सेनेच्या ध्येय धोरणावर तसेच केंद्रीय सरचिटणीस हिरेन जी रेडकर यांनी कर्मचाऱ्यांकरता असलेली दृष्टी यावर विश्वास ठेवून अमरावती विभागातील वरुड आगारातील इतर संघटनेतील ६० कामगारांनी कामगार सेनेमध्ये जाहीर प्रवेश केला कार्यक्रमाची सुरुवात कामगार सेनेच्या नाम फलकाचे मान्यवरांच्या हस्ते उद्‌घाटन करून करण्यात आली .

# सद्गुरु धाम श्री. संत गजानन महाराज मंदिराला क वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा

प्रतिनिधी २१ जानेवारी

**दर्यापूर :** दर्यापूर तालुक्यातील वडनेरगंगाई येथील श्री. सद्गुरुधाम श्री. संत गजानन महाराज मंदिराला महाराष्ट्र शासनाचा क वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा घोषित झाला आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या या पाठपुरावाला अखेर यश आले आहे. एकंदरीतच गजानन महाराज मंदिराच्या भव्य आणि प्रशस्त विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे ग्रामस्थ व गजानन भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

दर्यापूर तालुक्यातील वडनेर गंगाई येथील श्री सद्गुरु धाम गजानन महाराज मंदिर पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. वर्षभर हजारो भाविकांची या ठिकाणी दर्शनासाठी ये जा असते. संत गजानन महाराज यांचा प्रगट दिन, ऋषिपंचमी महोत्सव तसेच इतर धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात येथे होतं असल्याने संस्थांचा सर्वांगीण विकास व्हावा अशी मागणी संस्थांचे अध्यक्ष अनिलकुमार गावंडे यांच्यासह त्यांच्या विश्वस्त मंडळाने खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्याकडे केली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी याबाबत तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र देत संस्थांनला क वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा द्यावा यासाठी पाठपुरावा सुरू केला होता. त्यांच्या या पाठपुराव्याला अल्पावधीतच यश आले आहे.

# न्याय मिळेपर्यंत अंत्यसंस्कार नाहीत; तिवसा पोलिस ठाण्यात मृतदेह घेऊन नागरिकांचा ठिय्या

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अमरावती :** मंथन देशमुख या तरुणाचा दुचाकी अपघातात मृत्यू झाल्यानंतर आरोपी बोलेरो चालकावर कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ संतप्त नागरिकांनी मृतदेह तिवसा पोलिस ठाण्यात आणून ठिय्या आंदोलन केले. आरोपी चालकाला अटक होईपर्यंत अंत्यसंस्कार न करण्याची ठाम भूमिका नातेवाईक व ग्रामस्थांनी घेतली.

मंथन देशमुख या तरुणाचा १७ जानेवारी रोजी दुपारी दीड वाजताच्या




सुमारास दुचाकी अपघात झाला होता. वणी फाटा येथे दुचाकीवरून जात असताना नागपूरकडून भरधाव वेगात येणाऱ्या बोलेरो वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील श्रीकांत सुधीर देशमुख (३५) यांच्या पायाला तर मंथन देशमुखच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. अपघातानंतर मंथन देशमुखला अमरावती येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच मंगळवारी मंथनचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून कुटुंबीय व नातेवाईकांवर शोककळा पसरली आहे. दरम्यान, मंथनच्या मृत्यूनंतर संतप्त झालेल्या वणी परिसरातील नागरिकांनी मृतदेह तिवसा पोलिस ठाण्यात आणत आरोपी बोलेरो चालकाला अटक करण्याची जोरदार मागणी केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट **खामगाव**

# लाडकी बहीण योजनेतील अपात्र अन्यायाविरोधात एल्गार !

प्रतिनिधी २१ जानेवारी

**खामगाव :** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेत झालेल्या गंभीर तांत्रिक त्रुटींमुळे खामगाव शहरातील अनेक पात्र महिलांचे अनुदान अचानक बंद झाल्याचा प्रकार समोर आला असून, यामुळे शेतमजूर व हातमजूर महिलांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने नोव्हेंबर महिन्याचा हप्ता न मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर दि. ११ जानेवारी २०२६ रोजी खामगाव येथे लाडकी बहीण योजना मार्गदर्शन कॅम्प ओबीसी महासंघातर्फे आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पदरम्यान अनेक महिलांची ई-केवायसी करताना चुकीची नोंद झाल्याचे निदर्शनास आले. काही महिलांनी मोबाईलद्वारे ई-



केवायसी करण्याचा प्रयत्न केला असता, तांत्रिक अडचणींमुळे त्यांचा थेट योजनेतील लाभ बंद झाल्याचे स्पष्ट झाले.विशेष म्हणजे, लाडकी बहीण योजनेची अधिकृत वेबसाईट तसेच नारीशक्ती ॲपवर सध्या ई-केवायसी प्रक्रिया बंद असल्याने पुनश्च केवायसी करण्याचा कोणताही पर्याय उपलब्ध नाही. परिणामी, पूर्णतः पात्र असूनही अनेक गरीब व मजूर महिलांना अपात्र ठरविण्यात आले आहे. काही प्रकरणांमध्ये तर मजूर महिलांना सरकारी कर्मचारी असल्याचे सिस्टीमवर दर्शविले जात असून, हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.या सर्व महिलांनी प्रतिज्ञापत्राद्वारे आपण योजनेस पात्र असल्याचे नमूद केले असून, त्यांची सविस्तर यादी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आली आहे. भविष्यात यावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्यास महिलांमध्ये शासनाविरोधात तीव्र असंतोष निर्माण होऊ शकतो .दरम्यान,या अन्यायाविरोधात राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष गणेश जगन्नाथ चौकसे व युवा जिल्हाध्यक्ष सूरज बेलोकार यांच्या नेतृत्वाखाली शेकडो महिलांनी खामगाव येथून बुलडाणाकडे मोर्चा काढत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली.

# हजारो महिलांचे लाडकी बहीण योजनेचे पैसै थांबले !

प्रतिनिधी २१ जानेवारी

**बुलढाणा :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना मानली जाते. मात्र, बुलढाणा जिल्ह्यात या योजनेचा लाभ घेणाऱ्या सुमारे ३० हजार महिलांचा गेल्या दोन महिन्यांपासूनचा १५०० रुपयांचा मासिक हप्ता अचानक थांबल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

योजना कायमस्वरूपी बंद होणार असल्याच्या अफवा पसरल्याने ग्रामीण भागातील महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, संतप्त महिलांनी जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयात गर्दी करत चौकशी सुरू केली आहे. बुलढाणा जिल्ह्यात सध्या साडेसहा लाखांहून अधिक महिला लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत आहेत. मात्र, प्रशासकीय पडताळणीदरम्यान ई-केवायसी प्रक्रियेत त्रुटी आढळल्याने सुमारे ३० हजार लाभार्थी महिलांचे हप्ते तात्पुरते रोखण्यात आले आहेत. बँक खाते आधारशी लिंक नसणे, आधार तपशीलात तफावत किंवा तांत्रिक अडचणी ही यामागची प्रमुख कारणे असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर महिला व बालकल्याण विभागाने खुलासा करत योजना बंद झालेली नसल्याचे स्पष्ट केले आहे. केवळ ज्यांच्या कागदपत्रांमध्ये किंवा ई-केवायसी प्रक्रियेत त्रुटी आहेत, त्यांचाच लाभ तात्पुरता थांबवण्यात आला असून, आवश्यक दुरुस्ती पूर्ण होताच रखडलेले हप्ते मिळणार असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. दरम्यान, अन्य काही ठिकाणीही पैसे न आल्याने महिलांनी आंदोलनाचा पवित्रा घेतल्याचे चित्र आहे.

# दिव्यांग ५टक्केनिधी वाटप करण्यात यावे यासाठी विराट मल्टिपर्पज फाउंडेशन च्यावतीने निवेदन

प्रतिनिधी २१ जानेवारी

**खामगाव:** ग्रामपंचायत स्तरावर अभय योजना अंतर्गत कर वसुली चांगली झाली आहे या मधून दिव्यांग हक्कासाठी असलेला ५ℨ निधी वितरीत करण्यात यावे या करिता विराट मल्टिपर्पज फाउंडेशन खामगाव या दिव्यांग संस्थेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. बुलढाणा गट विकास अधिकारी पंचायत समिती खामगाव जिल्हा बुलडाणा यांना देण्यात आले खामगाव येथे गटविकास अधिकारी चंदनसिंग राजपूत यांनी निवेदन स्वीकारले.

जिल्हा परिषद पंचायत समिती कार्यक्षेत्रातील ग्राम पंचायत मध्ये दिव्यांग नोंदी उपलब्ध आहे त्यांना शासन ग्रामविकास परिपत्रक नुसार ५%अर्थ सहाय्य प्रदान करण्यात बहुतांश ग्राम पंचायती प्रत्येक वर्षी टाळाटाळ करत असतात नेहमी वसुली न झाल्याचे कारण देत




कर्मचारी अधिकारी वेळ मारून नेण्याचा प्रकार करीत असतात त्यांना एक नियमावली आखून देण्यात यावी. सध्या शासनाने ५०ℨ कर सवलत साठी अभय योजना नुसार वसुली सुरु आहे त्यात भरघोस प्रतिसाद पाहता ५% दिव्यांग स्वनिधी चे वाटप मागील काळातील थकीत व चालू वर्षचे वाटप येत्या २६ जानेवारी २०२६ गणराज्य दिनाच्या पूर्वसंध्येला किंवा त्याच दिवशी वाटप करण्याचे आदेश देत त्यासाठी आपण जातीने लक्ष घालून हे वितरण करण्यात पावे तसेच २) घरकुल मध्ये सुध्दा प्रथम लाभार्थी म्हणून निवड करण्यात यावी ३) काही ग्राम पंचायत ५०ℨ कर सूट दिव्यांग व त्यांच्या कुटुंबाला सवलत देत नाही ती देण्यात यावी अश्या मागणीच्या निवेदनाची दखल घेत कार्यवाही करण्याचे निवेदन देण्यात आले यावेळी विराट मल्टिपर्पज फाउंडेशन संस्था अध्यक्ष मनोज नगरनाईक प्रहार शहराध्यक्ष शत्रुघ्न इंगळे,मो.राईस,बापू नाना दामोदर,उमेश देशमुख,विलास चतृभुज शेखर तायडे आदी यावेळी उपस्थित होते.

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# वासुदेवजी महाराज अवतिर्णोत्सव सप्ताहाचे आयोजन



**अकोट** श्री ज्ञान भास्कर सेवा संस्थान हिंगणी खुर्द द्वारा संचालित श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ येथे गत १० वर्षा पासून याही वर्षी दि. १३ ते २० .२.२०२६ या कालखंडात संत श्री वासुदेवजी महाराज अवतिर्णोत्सव तथा मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनाचे औचित्य साधून श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामूहिक पारायण तसेच संतश्रेष्ठ आदिशक्ती मुक्ताईच्या ' ताटी उघडा ज्ञानेश्वरा' या मालिका प्रकरणातील अभंगांवर ज्ञानयज्ञ प्रवचन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.उपरोक्त कार्यक्रमात दररोज पहाटे ५ ते ६ काकडा भजन ७ ते ८ विष्णुसहस्त्रनाम तथा गोपी गीत व भ्रमर गीत पठण. ९ ते १२ ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामूहिक पारायण. १२ ते १ गाथा भजन. दुपारी ३ ते ५ या वेळेत भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे चिंतनीय ' ताटी उघडा ज्ञानेश्वरा ' या विषयावरील प्रवचन ५ ते ६ वारकरी संध्या हरिपाठ लगेच सात ते नऊ या वेळेत श्री ज्ञानेश आश्रमाच्या आजी माजी नामवंत विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण कीर्तने होतील .

## ई झोन एसआयपी अबॅकसने पटकाविला

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अकोला :** एसआयपी अकॅडमीच्या वतीने नुकत्याच जळगाव येथील कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित केलेल्या अबॅकस स्पर्धेत महानगरातील ई झोन एसआयपी अबॅकसच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत अनेक सुवर्ण व रजत पदक प्राप्त करीत चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स हा सर्वोच्च पुरस्कार प्राप्त केला. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून बहिणाबाई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. विजय माहेश्वरी उपस्थित होते.यावेळी एसआयपी अकॅडमी, भारताचे व्यवस्थापकीय संचालक दिनेश विक्टर, जळगाव येथील रायसोनी व्यवस्थापन महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा.प्रीती अग्रवाल तसेच एसआयपी अकॅडमीचे क्षेत्रीय प्रमुख राजेंद्र नण्णावारे आदी उपस्थित होते.या स्पर्धेत २४ जिल्ह्यांतील १२०० एसआयपी अबॅकसचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

## मिशन एक्सीलेन्स उपक्रम विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार : जिल्हाधिकारी वर्षा मीना

**अकोला:** विद्यार्थांना गुणवत्तापूर्ण अध्ययनाच्या माध्यमातून शैक्षणिक आमूलाग्र बदल घडवण्यासाठी (टार्गेट पीक) हे शैक्षणिक अॅप विकसित करण्यात आले असून जिल्हा वार्षिक योजना नावीन्यपूर्ण योजनेच्या माध्यमातून मिशन एक्सीलेन्स उपक्रम जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता चौथी, पाचवी, सातवी आणि आठवी मधील २० हजार विद्यार्थ्यांसाठी महत्वाची भूमिका बजावणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज इथे केले. नियोजन भवन येथे जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक,विस्तार शिक्षण अधिकारी यांची शैक्षणिक अॅप संदर्भात कार्यशाळा घेण्यात आली यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार उपशिक्षणाधिकारी श्री.प्रधान, मुख्यमंत्री कार्यालय फेलो भारसकर आदी उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्हिडिओच्या माध्यमातून शिक्षण,प्रश्नोत्तरे आणि उत्तरे, विशेष व्याख्याने ह्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या शैक्षणिक अॅपचा वापर करावा तसेच शैक्षणिक गुणवत्तेबाबत वेळोवेळी तपासणी करावी असे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले.

# बार्शीटाकळीत महिलांचा पिण्याच्या पाण्यासाठी एल्गार !

प्रतिनिधी २१ जानेवारी

♦ तहसील कार्यालयावर महिला व नागरिक धडकले



**बार्शीटाकळी :** तहसील कार्यालयाच्या मागे एकट नगर वार्ड क्रमांक दोन मध्ये पिण्याचे पाण्याची खूप हाल होत आहे या ठिकाणी खळखळ भाग जास्त असून बोरिंग होत नाही जे बोरिंग आहेत त्या ठिकाणी नवीन रस्ते बांधण्यात आले त्या रस्त्यामध्ये बोरिंगला पूर्णतः रोड मध्ये पॅक करण्यात आले लोक पिण्याच्या पाणी करिता हापसीला हांडे बाटली लावत असून लागत नाही या लोकांना यायला पाणी भेटत नाही वाट क्रमांक दोन मधील लोकांनी नगरपंचायत ला वारंवार तक्रार केली असून या तक्रारीवर नगरपंचायत चे वरिष्ठ अधिकारी व ठेकेदार यांनी हो हो करत काही काम केले नाही या ठिकाणी काही लोकांनी माहितीचे अधिकार टाकले असून त्यांना माहिती पुरवण्यात आली नाही ज्या लोकांनी काल दिनांक २० जानेवारी २०२६ ला अंडे मोर्चा थेट तहसील कार्यालयावर मांडले असून तहसीलदार साहेब यांना लेखी स्वरूपात निवेदन देण्यात आले आणि तहसीलदार यांना सांगितले की जर या उन्हाळ्यामध्ये आम्हाला याच पाण्याची व्यवस्था करून देण्यात यावी अन्यथा आम्ही तहसील कार्यालयावर प्रिय मांडू या अगोदर वार्ड क्रमांक दोनचे नगरसेवक विनोद राठोड बीजेपी पार्टीचे असून यांनी वार्ड क्रमांक दोन च्या नागरिकांना सांगितले होते की तुम्ही मला निवडून द्या मी तुमच्या सगळं समस्या दूर करून दिन पण इच्छा काही समस्या दूर न करता अजून या लोकांच्या समस्या वाढल्या आहेत मागील इलेक्शन मध्ये नवीन उमेदवार ही तिथं त्यांच्या समस्या सोडविण्याच्या आश्वासन दिले होते पण काम जिथे ते असून लोकांच्या समस्या कोण दूर करीन असा प्रश्न नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे



# अकोट नगर परिषदेत स्थायी समिती व विषय समित्यांचे गठन

वि प्रतिनिधी २१ जानेवारी



**अकोट :** अध्यक्ष, उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडीनंतर दि. २० जानेवारी रोजी अकोट नगर परिषदेत स्थायी समिती सदस्यांचे नामनिर्देशन व विविध विषय समित्यांच्या सभापतींची निवड करण्यासाठी विशेष सभा पार पडली. ही सभा उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर व मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांच्या उपस्थितीत झाली.

या सभेमध्ये एकूण सहा विषय समित्यांचे सभापती निवडून स्थायी समितीचे गठन करण्यात आले. नगराध्यक्ष माया विवेकराव धुळे या पदसिद्ध सभापती म्हणून स्थायी समितीवर राहणार असून उपाध्यक्ष प्रथमेश संजय बोरोडे हे नियोजन व विकास समितीचे पदसिद्ध सभापती असतील,व बांधकाम समिती सभापतीपदी सुशील पुंडकर (प्रहार), आरोग्य समिती सभापतीपदी मनीष कराळे (भाजप), पाणीपुरवठा समिती सभापतीपदी अमोल पालेकर (भाजप), महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी नयना इंगोले (शिंदेसेना) आणि शिक्षण समिती सभापतीपदी सलमा बेगम मो. खालिद (राष्ट्रवादी – अजित पवार) यांची निवड झाली. नियोजन समितीचे पदसिद्ध सभापती उपाध्यक्ष प्रथमेश बोरोडे आहेत. महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापतीपदी शुभांगी टेमझरे (भाजप) यांची निवड झाली असून स्थायी समिती सदस्यपदी सीताबाई मर्दाने (भाजप), निकिता जुनघरे (राष्ट्रवादी – शरद पवार) व शेख ख्वाजा अ. रशीद (काँग्रेस) यांची निवड करण्यात आली आहे. या नव्या समित्यांमुळे नगर परिषदेच्या प्रशासकीय कामकाजाला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# राजे संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा



प्रतिनिधी २१ जानेवारी

**मुर्तीजापुर :** राजे संभाजी मंडळाच्या वतीने राजे संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला आहे

राजे संभाजी महाराज यांचा दूध अभिषेक व हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्ष मंडळाचे अध्यक्ष उमेश देशमुख मंडल चे प्रमुख कार्यकर्ते संजय जयस्वाल मुकेश काळपांडे सचिन सरोदे श्याम शिंदे उदय शिंदे नितीन शिंदे राजू दुरतकर महादेव आगाशे संदीप टेमझरे समर्थ शिंदे रघुवीर शिंदे संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष संजय गुप्ता प्रामुख्याने उपस्थित होते संजय जयस्वाल यांनी राजे संभाजी महाराज चे विचार शौर्य त्या धर्मभीमानाचा वारसा पुढे नेण्याचा आव्हान कार्यकर्त्यांना केली स्वर्गीय मंगेश देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली यावेळी रुचित सरोदे सौरभ देशमुख अनिल गुप्ता विशाल तायडे गोपाल गोलाम मंगेश धाने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संजय जयस्वाल यांनी केले

# युवराज कदम यांच्या पंस उमेदवारीसाठी टिटवा वासियांचे समर्थन

प्रतिनिधी २१ जानेवारी



**अकोला :** नुकत्याच महानगर पालिका निवडणुका संपल्या असून आता लवकरच जि प - पंचायत समिती निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे त्या अनुषंगाने टिटवा येथील सर्वांसाठी सुखदुःखात अथवा रुग्णसेवेसाठी नेहमी धावून येणारे युवराज रामचंद्र कदम यांना टिटवा गन ८७ पंचायत समिती मतदार संघातून भारतीय जनता पार्टी तर्फे उमेदवारी मिळावी म्हणून लोकप्रिय आमदार आदरणीय हरीशजी पिंपळे साहेबांनी दिलेल्या निर्देशानुसार रविवार दि.१८ जानेवारी २०२६ रोजी समस्त गावकऱ्यांच्या उपस्थितीत सभेचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे काही दिवसापूर्वी मुर्तीजापुर येथे साहेबांच्या हस्ते पक्ष प्रवेशाचे नियोजन करण्यात आले होते. त्यावेळेस मराठा उत्कर्ष सेवा मंडळाचे पदाधिकारी व गावातील ५० ते ६० विविध समाज बांधव व युवकांनी प्रवेश करून घेतला होता. व लगेच आमदार साहेबांना आमच्या येथे २००० च्या वर मतदार असल्याचे निदर्शनात आणून या वेळेस आमच्या गावातील युवराज कदम यांच्या उमेदवारीबाबत विचार विचार व्हावा असे विनंती वजा निवेदन दिले होते. साहेबांनी व्यवस्थित समजावून आम्हाला नाराज न करता दोन बाबीवर लक्ष देण्याचे मार्गदर्शन केले. त्यामध्ये नंबर एक, संबंधित मतदारसंघातील सर्व बूथप्रमुख व परिसरात संपर्क करा. व नंबर दोन, टिटवा गावात एकत्र बसा,एकत्रीकरनावर भर द्या. असे म्हणून कामाला लागल्यास हरकत नाही. असे आश्वासन दिले होते तेव्हापासूनच आम्ही कामाला लागलो असून गावात एकत्र बसण्यासाठी बैठकीचे आयोजन केले . यामध्ये गावातील श्रेष्ठ, ज्येष्ठ विशेषतः युवक मंडळींनी मला उमेदवारी मिळावी म्हणून तन मन धनाने समर्थन देऊन शेवटपर्यंत सोबत राहण्याचे वचन दिले. आम्ही आमदार साहेबांनी सांगितलेल्या प्रमाणे आपल्या गावातून १००० च काय त्याहीपेक्षा जास्त मतदान करून बहुसंख्य मतांनी विजयी करू, आणि शेवटपर्यंत तुमच्या पाठीशी राहू, असा निर्धार सुद्धा व्यक्त केला, एवढेच नव्हे तर बऱ्याच नागरिकांनी फोन वर संपर्क करून आमचे पूर्ण समर्थन राहील असा मानस व्यक्त केला. आणि माझा उत्साह वाढविला. त्याचवेळी मी आपल्या गावासाठी काहीतरी करून दाखवेल व नाव खराब होऊ देणार नाही अशी ग्वाही देऊन सर्वांचे आभार मानले.

## कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सुरू

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अकोला:** राष्ट्रीय जनगणना प्रक्रियेची प्रशासकीय तयारी सुरू झाली असून, कर्मचा-यांच्या प्रशिक्षणालाही प्रारंभ झाला आहे. त्यात महाराष्ट्र जनगणना संचालनालय व केंद्रीय गृह मंत्रालय यांच्या वतीने कार्यशाळा नियोजनभवनात आज झाली. विश्वासार्ह आकडेवारी गोळा करण्यासाठी अद्ययावत साधने व यंत्रणेची तरतूद असून, अधिकारी-कर्मचा-यांनी प्रक्रियेतील प्रत्येक तरतूद काळजीपूर्वक जाणून घ्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले. प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात नियोजनभवनात तहसीलदार, नगरपरिषद मुख्याधिकारी, मंडळ अधिकारी यांची कार्यशाळा घेण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील,जनगणना संचालनालयाचे श्री.भगत, श्री.साळगावकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, आंतरराष्ट्रीय मानकांचा अवलंब करत अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून माहिती संकलन करण्यात येणार आहे. अचूक आणि विश्वासार्ह लोकसंख्या आकडेवारी गोळा करण्यासाठी मोबाइल ॲप्लिकेशनबरोबरच संपूर्ण देखरेखीसाठी केंद्रीय पोर्टलचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे अचूक व गुणवत्तापूर्ण माहिती मिळण्यास मदत होणार आहे. जनगणना संचालनालयाचे श्री. भगत म्हणाले की, राष्ट्रीय जनगणना कुठल्याही अडथळ्याशिवाय पूर्ण करण्यात येईल.

# असिस्टंट बँक मॅनेजरपदी प्रज्ञा वाघ हिची निवड

प्रतिनिधी २१ जानेवारी

♦ गावकऱ्यांनी केला पालकांसह सत्कार



**अकोट :** अकोट तालुक्यातील बळेगाव येथील रहिवासी तथा सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी प्रमोद वाघ यांची सुकन्या प्रज्ञा वाघ हिने बँकिंग क्षेत्रातील अधिकारी वर्गाची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण केली. महाराष्ट्र बँकेच्या असिस्टंट मॅनेजरपदी निवड झाल्याने तिचा सत्कार बळेगाव परिसरातील नागरिकांनी केला.

प्रज्ञा वाघ हिची नियुक्ती बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये असिस्टंट मॅनेजरपदी झाली असल्याने तिचा सत्कार करण्यात आला. गावातील सागर वडतकर, पत्रकार राजकुमार वानखडे, पवन निमकाळे, रमेश वाघ, सुरेश वाघ,साहेबराव वाघ, संजय तंतरपाळे , राजु काळे योगेश वडतकर, सागर रहाटे, जयंता टेकाडे, शुभांगी चावके, संध्या महाजन,पद्मसिंह ठाकुर, हेमंत महाजन, पवन इंगळे, दिपाली दामोदर, गजानन वाघ, सतीश धांडे,संगीता वाघ, कल्पना धांडे,यांनी कु प्रज्ञा वाघ हिचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# प्रभातमध्ये डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवासी शिबिर संपन्न

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अकोला :** अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेच्या दुसऱ्या टप्प्यावरील प्रत्यक्ष परीक्षेची तयारी करून घेणारे निवासी शिबिर प्रभात किड्समध्ये नुकतेच संपन्न झाले. अकोला, छत्रपती संभाजीनगर व सोलापूर येथील विद्यार्थ्यांनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदविला. शिबिराचे उद्घाटन प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, तज्ज्ञ मार्गदर्शक प्रदीप सोमाणी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून सुधीर आवटी, डॉ.टोक्शा, डॉ. त्रिशूल कुळकर्णी, सौ. ज्योत्स्ना, कोमल कापसे, शुभांगी व्यवहारे, शुभम डांगे, पुजा ठाकुर उपस्थित होते. त्यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर सर्व शिबिरार्थिंनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवनशास्त्र या तीनही विषयांची संबंधित प्रयोग स्वतः करून पाहिले. प्रभातच्या भव्य अशा लॅबस्मध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मदतीने हे सर्व प्रयोग करण्यात आले. या निवासी शिबिरामुळे एक वेगळा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे शिबिरार्थिंनी सांगितले. यावेळी समारोप समारंभात पालकांनी देखील आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शक प्रदीप सोमाणी, प्राचार्य वृषाली वाघमारे, समन्वयक व्ही. अनुराधा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## आरएलटी विज्ञान महाविद्यालयात स्व.प्राचार्य म.गो.जोशी स्मृतिदिन विविध उपक्रमांनी संपन्न

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अकोला :** स्थानिक दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आरएलटी विज्ञान महाविद्यालयात माजी प्राचार्य स्व.एम.जी. उपाख्य म.गो.जोशी यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर, पारितोषिक वितरण तथा माजी विद्यार्थी कार्यकारिणी सभा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दि बीजीई संस्थेचे अध्यक्ष अॅड. मोतीसिंह मोहता, विशेष उपस्थितीत उपाध्यक्ष, इंजि.अभिजीतजी परांजपे, मानद सचिव डॉ.पवनजी माहेश्वरी तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राध्यापक व विभाग प्रमुख, पदव्युत्तर शिक्षण विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती प्रा.गजानन गुल्हाने उपस्थित होते. यावेळी मंचावर महाविद्यालयीन विकास समिती सदस्य सौ.शैलजाताई अंधारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश चंद्रवंशी, माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष प्रशांत बुले, आयक्युएसी समन्वयक डॉ.राजेंद्र रहाटगांवकर, डॉ.पूनम अग्रवाल, माजी प्राचार्य डॉ.विजय नानोटी आदी मंचावर उपस्थित होते. स्व.म.गो.जोशी यांचे प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. मंचावरील मान्यवरांचे रोपटे देवुन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागतपर मनोगत प्राचार्य डॉ.राजेश चंद्रवंशी यांनी केले. त्यांनी आपल्या मनोगतात स्व.जोशी हे कर्मनिष्ठ व्यक्तिमत्व होते असे सांगुन ४ प्राध्यापकांसह २४ रक्तदात्यानी रक्तदान तर ५० विद्यार्थ्यानी रक्तगट तपासणी केल्याचे प्रास्ताविकात नमुद केले. प्रमुख वक्ते प्रा.गजानन गुल्हाने यांनी आपण या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असुन जुन्या आठवणींना उजाळा करून देतांना त्यावेळचे प्राध्यापक विद्यार्थ्यांवर खुप मेहनत घेत हे नमुद करतांना विद्यार्थ्यांनी अवांतर वाचनाची सवय लावावी, शैक्षणिक प्रवासामध्ये शासनाच्या विविध योजना जसे मुक तसेच स्वयंम सारख्या विनाशुल्क अॅपचा व सुविधांचा प्रभावी वापर करून ज्ञानअर्जित करावे, परिस्थितीनुसार जगा, आपल्या आंतरिक क्षमता ओळखुन त्या विकसीत करा प्रबळ इच्छाशक्ती महत्वाची असून अपयशातून शिकत पुढे जा असा संदेश दिला.

# तेल्हारा नगर परिषद विषय समिती सभापतीपदाची निवड अविरोध









प्रतिनिधी २१ जानेवारी


**तेल्हारा :** नगर मालिकेच्या विषय समिती सभापती पदाची निवडणूक नगर पालिकेच्या अटलबिहारी वाजपेयी सभागृह्यत ही निवडणूक पार पडली यामध्ये सहा सभापती व एक उपसभापती पदाची निवड करण्यात आली.

तेल्हारा नगराध्यक्ष वैशाली पालीवाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. स्थायी समितीच्या सभापती पदी नगराधाक्ष है पदसिद्ध अध्यक्ष असल्याने त्यांची निवड करण्यात आली. यामध्ये उपाध्यक्ष सचिन तायडे यांची नियोजन व विकास समिती सभापती पदी निवड करण्यात आली. बांधकाम समिती सभापती पदी विजयसिंह बलोदे यांची निवड करण्यात आली. स्वच्छता व आरोग्य समिती सभापतीपदी सतिष जयस्वाल गांची निवड करण्यात आली आहे. पाणी पुरवठा व जलनिस्थारण समिती सभापती पदी अमित अग्रवाल यांची निवड करण्यात आली शिक्षण व क्रीडा संस्कृतीक सभापती पदी सी साक्षी वानखडे यांची निवड करण्यात आली आहे सी गायत्री सोळंके यांची महीला व बालकल्याण समिती सभापती पदी निवड करण्यात आली आहे. सी रुगाली हागे यांची महीला व बालकल्याण समिती उपसभापती पदी निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार महेश रामगुडे व त्यांना सहायक म्हणून मुख्याधिकारी सतीश गावंडे यांनी कामकाज पाहिले. सर्वप्रथम भाजपाचे गटनेता प्रशांत उर्फ अतुल विखे यांनी पक्षाकडून विविध समित्यांचे सदस्य पदाकरता ठराव मांडला त्यानंतर सभापती पदाकरता पक्षाकढून मिळालेल्या निर्देशाप्रमाणे गटनेता यांनी नाव सुचतिले गामलो स्थायी समितीच्या सभापती पदी नगराध्यक्ष हे पदसिद्ध अध्यक्ष असल्याने त्यांची निवड करण्यात अकली स्थायी समितीमध्ये विरोधी पक्षाच्या एकाही सदस्याचा समावेश नाही.

# शिवजयंती उत्सव समिती अकोटची कार्यकारिणी गठीत

♦ अध्यक्षपदी सुरज शेंडोकार, कार्याध्यक्षपदी चेतन गुरेकार यांची निवड

प्रतिनिधी २१ जानेवारी




**अकोट :** स्थानिक अकोट येथे १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणाऱ्या शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर नागोबा संस्थान, शिवाजीनगर येथे मोठे शिवजयंती उत्सव समितीची बैठक उत्साहात पार पडली. बैठकीच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन तसेच महाराणा प्रताप यांच्या फोटोला हार अर्पण करण्यात आला. यावेळी स्वर्गीय तात्यासाहेब शिंगनारे व स्वर्गीय प्रल्हादराव जवंजाळ यांच्या फोटोचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

बैठकीचे संचलन प्रतीक गोरे यांनी केले तर प्रास्ताविक राजेश नागमते यांनी मांडले. प्रभुदास तळोकार यांनी मनोगत व्यक्त केले तर पुरुषोत्तम चौखंडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी शिवजयंती उत्सव समिती २०२६ ची कार्यकारिणी सर्वानुमते गठीत करण्यात आली. अध्यक्ष: सुरज शेंडोकार कार्याध्यक्ष: चेतन गुरेकार सचिव: गोपाल पेढेकर, शंतनू खवले उपाध्यक्ष: पवन सपकाळ, अक्षय जायले, निखिल झाडे, विक्की मोरे, अक्षय घायल, राहुल माकोडे कोषाध्यक्ष: प्रवीण टाकळकर, ओम घोरड सहसचिव: आनंद शिवरकर, कुंदन तेलगोटे, यश वर्मा प्रसिद्धी प्रमुख: गौरव महल्ले, सुमित भगत, आकाश शेरेकर सदस्य: शुभम सोळंके, तेजस भलतिलक, नवनीत काळे, प्रवीण लोखंडे, प्रथमेश मेहेरे, मयूर शिंदे, पियुष लहाने, सोयल वानखडे यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून संजय गोरे, राजेश नागमते, प्रभुदास तळोकार, पुरुषोत्तम चौखंडे, अविनाश गावंडे, सचिन शिंदे, मनोज झाडे, श्रीजीत कराळे, निनाद मानकर, प्रतीक गोरे,सागर उखंडे, चेतन मर्दाने, प्रथमेश बोरोडे, सागर उकडे, अनिकेत कुलट, आचल बेलसरे, गोलू भगत, प्रसन्न जवंजाळ, मुकुंद नागमते, चेतन देवळे, अनिकेत पोतले, सागर कराळे, अनंत मिसाळ, सुहास वाघ, शिवा टेमझरे आदी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपीला 20 वर्षांची शिक्षा

प्रतिनिधी २१ जानेवारी



**यवतमाळ :** जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील कोपरा गावातील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेऊन वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली होती. या प्रकरणात आरोपी श्याम माणिक ढोले (वय २४, रा. कोपरा, ता. आर्णी) याला

२० वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. हा निकाल अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने दिला. आरोपीने मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेले.

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील बनवाडी येथे भाड्याने खोली घेऊन राहून तिच्यावर अनेकदा लैंगिक अत्याचार केले. या प्रकरणाचा गुन्हा आर्णी पोलीस ठाण्यात क्रमांक ३४६/२०२१ अंतर्गत भादंवि कलम ३६३, ३६६, ३७६ (२), ३७६ (२) (ज)(न) तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४ आणि ६ अंतर्गत दाखल करण्यात आला होता. पोलीस उपनिरीक्षक शिवराज पवार यांनी तपास करून पिडित मुलगी व आरोपीचा शोध घेतला. परिस्थितीजन्य, लेखी आणि तोंडी पुरावे गोळा करून १२ जुलै २०२१ रोजी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, दारव्हा येथे दोषारोपपत्र दाखल केले.

न्यायालयाने प्रकरणातील ८ साक्षीदारांची साक्ष नोंदवली. पिडित मुलीची साक्ष ग्राह्य धरून न्यायाधीश संजीवकुमार नरवाडे यांनी २० जानेवारी २०२६ रोजी निकाल दिला. न्यायालयाने आरोपीला खालील शिक्षा सुनावल्या: भादंवि कलम ३६३ : ३ वर्षे सक्त मजुरी + ५,००० रुपये दंड. भादंवि कलम ३६६ : ५ वर्षे सक्त मजुरी + ५,००० रुपये दंड. भादंवि कलम ३७६ (२) : १० वर्षे सक्त मजुरी + १०,००० रुपये दंड. भादंवि कलम ३७६ (२) (ज)(न) : १० वर्षे सक्त मजुरी + १०,००० रुपये दंड. पोक्सो कलम ४ : २० वर्षे सक्त मजुरी + २५,००० रुपये दंड. पोक्सो कलम ६ : २० वर्षे सक्त मजुरी + २५,००० रुपये दंड. दंडाची रक्कम पिडित मुलीला देण्याचा आदेश देण्यात आला आहे. सरकारी पक्षातर्फे ॲड. अंकुश एस. देशमुख यांनी बाजू मांडली. तपास पोलीस उपनिरीक्षक शिवराज पवार आणि लेखनिक विशाल गावंडे यांनी केला, तर कोर्ट पैरवी सफौ गजानन भगत यांनी पाहिली.

हे प्रकरण बाल लैंगिक शोषणाविरोधातील कठोर कारवाईचे उदाहरण आहे. पोक्सो कायद्यांतर्गत अशा गुन्ह्यांना कठोर शिक्षा सुनावली जात असल्याचे दिसून येते.

# वडिलांची हत्या करणाऱ्या मुलास जन्मठेप

प्रतिनिधी २१ जानेवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यातील मनदेव येथे जेवणाच्या मुद्द्यावरून वाद होऊन मुलाने वडिलांची क्रूर हत्या केल्याची घटना घडली होती. या प्रकरणात आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

विनोद दादाराव खडके (वय ३५, रा. मनदेव, ता. जि. यवतमाळ) असे शिक्षा ठोठावलेल्या आरोपीचे नाव आहे.

४ जुलै २०२१ रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास आरोपी विनोद दादाराव खडके हा गावातील जिल्हा परिषद शाळेच्या वरच्या मजल्यावर बसलेले वडील दादाराव खडके यांना जेवणासाठी बोलावण्यास गेला. वडिलांनी जेवण नाकारल्याने रागाच्या भरात विनोदने वडिलांना रस्त्यावर ओढत आणले. त्यानंतर लाकडी झिलपीने डोक्यावर वार केले आणि लाथा-घस्सांनी छाती व पोटावर मारहाण करून जिवे मारले. याशिवाय आई जयवंती दादाराव खडके यांना शिवीगाळ करून थोपट देऊन मारहाण केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणाचा गुन्हा यवतमाळ ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. आरोपी विनोदला तात्काळ अटक करण्यात आली. तत्कालीन तपास अधिकारी पोलीस निरीक्षक किशोर बळीराम जुनघरे यांनी तपास करून प्रकरण न्यायालयात दाखल केले.

न्यायालयाने प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, डॉक्टर, फिर्यादी (आई), पंच आणि तपास अधिकाऱ्यांच्या साक्षीचा विचार करून दस्तऐवजांचे विश्लेषण केले. दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी मा. न्यायालयाने आरोपी विनोद दादाराव खडके याला भादंवि कलम ३०२ (खुन) अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा ठोठावली असून १,००० रुपये दंड आकारला. दंड न भरल्यास अतिरिक्त ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. हे प्रकरण कौटुंबिक वादातून उद्भवलेल्या हिंसाचाराचे गंभीर उदाहरण आहे. तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक किशोर बळीराम जुनघरे यांनी केला. सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील मंगेश गंगलवार यांनी बाजू मांडली. साक्षीदार पडताळणी दरम्यान पोलीस निरीक्षक सुनिल नाईक तसेच कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा निता खडसे (बनं ५४७), पोकों वसंत बोरकर (ब नं १३४३) यांनी मार्गदर्शन केले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन युवक ठार

प्रतिनिधी २१ जानेवारी



**उमरखेड :** उमरखेड–पुसद राज्य मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत आंबाळी गावातील दोन युवकांचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना दि. १९ जानेवारी रोजी रात्री सुमारे नऊ वाजताच्या सुमारास कुपटी गावाजवळील दत्त मंदिर परिसरात घडली. या अपघाताने आंबाळी गावात शोककळा पसरली आहे.

विनायक काळे (३२), चंद्रकांत कऱ्हाळे (२२, रा. आंबाळी) अशी मृतकांची नावे आहे.

ते दोघे उमरखेड येथून आपले कामकाज आटोपून मोटारसायकल (एमएच २९ सीएच ४०३७) ने गावाकडे जात होते. कुपटी गावाजवळील दत्त मंदिर परिसरात उमरखेड–पुसद राज्य मार्गावर अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दोघेही युवक गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले.

रात्रीची वेळ असल्याने काही वेळ हा अपघात लक्षात आला नाही. त्यानंतर रस्त्याने ये-जा करणाऱ्या वाहनचालकांच्या निदर्शनास ही घटना आली. याबाबतची माहिती परशराम काळे यांनी पोफाळी पोलिस ठाण्यात दिली. दि. २० जानेवारी रोजी मृतदेहांचे शवविच्छेदन उमरखेड येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आले.

या प्रकरणी पोफाळी पोलिस ठाण्याचे ठाणेदार निलेश शेंबडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सुरेश शिंदे, जमादार शिवाजी पवार तपास करीत आहेत. अपघातास कारणीभूत ठरलेले अज्ञात वाहन पसार असून, पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. मृत युवकांवर आंबाळी गावात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# एसटी बस–बुलेटची धडक; तरुण ठार, एक गंभीर

प्रतिनिधी २१ जानेवारी



**दिग्रस :** तालुक्यातील हरसूल फाट्याजवळ एसटी बस व बुलेटची समोरासमोर धडक होऊन एका तरुणाचा मृत्यू झाला. तर एक युवक गंभीर जखमी झाला आहे. ही दुर्दैवी घटना १९ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास घडली.

राहुल रमेश डोल्हारकर (वय २४, रा. हरसूल) असे मृत तरुणाचे नाव असून, अजय संजय पारधी (वय १७, रा. हरसूल) असे गंभीर जखमी युवकाचे नाव आहे. एमएच-१४ एलएक्स-८९३९ क्रमांकाची इमामवाडा, नागपूर आगाराची एसटी बस नागपूरहून नांदेडकडे जात असताना हरसूल फाट्याजवळील वळणावर समोरून येणाऱ्या विनानंबर बुलेटला जोरदार धडक बसली.

या अपघातात बुलेटवरील दोघेही गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना तात्काळ दिग्रस ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार देण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने राहुल डोल्हारकर यांना यवतमाळ शासकीय रुग्णालयात, तर अजय पारधी यांना यवतमाळ येथील क्रिटिकेअर रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास राहुल डोल्हारकर यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नातेवाईक व ग्रामस्थांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. या घटनेचा पुढील तपास दिग्रस पोलीस करीत आहेत.

# सराईत गुन्हेगाराकडून देशी कट्टा व जिवंत काडतुस जप्त

प्रतिनिधी २१ जानेवारी

**यवतमाळ :** स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळच्या पथकाने दिग्रस शहरात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगारावर कारवाई केली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे केलेल्या सापळ्यात एक देशी बनावटीचा पिस्तूल आणि त्यात दोन जिवंत काडतुस जप्त करण्यात आले. आरोपीने शस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना नसल्याचे कबूल केले आहे.

मो. आसिम मो. अबजल (वय ३२, रा. सुभाष नगर, ता. दिग्रस, जि. यवतमाळ) असे आरोपीचे नाव आहे. दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दिग्रस पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहिती मिळाली. मो. आसिम मो. अबजल (वय ३२, रा. सुभाष नगर, ता. दिग्रस, जि. यवतमाळ) याच्याकडे अवैध



देशी कट्टा असून तो दिग्रस ते आर्णी बायपास जवळील हिंदू स्मशानभूमी परिसरात हजर आहे.

ही माहिती खात्रीशीर असल्याने पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पंचांसमक्ष संशयित इसमाचा शोध घेतला असता, आर्णी-दिग्रस बायपासवरील पुलाजवळ तो संशयास्पद रितीने बसलेला आढळला. त्याच्या कमरेत काहीतरी लपवलेले दिसल्याने त्यास शिताफीने ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने आपले नाव मो. आसिम मो. अबजल असे सांगितले.

अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेत खोचलेला एक देशी बनावटीचा स्टील सदृश्य धातूचा पिस्तूल (किंमत अंदाजे ५०,००० रुपये) आणि त्यातील मॅगझिनमध्ये दोन जिवंत पितळी काडतुसे (किंमत अंदाजे २,००० रुपये) असे एकूण ५२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संशयिताने शस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना नसल्याचे कबूल केले. याप्रकरणी दिग्रस पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३ आणि २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी आणि जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी दिग्रस पोलीस ठाण्यात हस्तांतरित करण्यात आला असून, तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन राठोड, पोलीस अंमलदार बबलु चव्हाण, मिधुन जाधव, सोहेल मिर्झा, किशोर झेंडेकर, पवन ढवळे, अमित झेंडेकर, जितेंद्र चौधरी यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.अवैध शस्त्रांच्या साठ्याविरोधात महाराष्ट्र पोलीस सातत्याने कारवाई करत आहेत. नागरिकांनी अशा घटनांची माहिती तात्काळ पोलीसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पाटणआई देवस्थान येथे स्नेहमिलन



प्रतिनिधी २१ जानेवारी

**झरी जामणी :** झरी जामणी तालुक्यातील पाटण पोलीस पाटील संघटनेच्या वतीने पोलीस पाटील दिनानिमित्त स्नेह मिलन सोहळा, मार्गदर्शन शिबिर व निरोप समारंभ पाटणआई देवस्थान, माथार्जुन येथे पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटण पोलीस स्टेशनचे ठाणेदार मिलिंद सरकटे हे होते. तर पीएसआय नागोराव जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्त पोलीस पाटील विजय भोयर, माथार्जुन ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र कायतवार तसेच पत्रकार योगेश मडावी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात मान्यवरांनी पोलीस पाटीलांची गावपातळीवरील महत्त्वपूर्ण भूमिका, प्रशासन व नागरिकांमधील दुवा म्हणून असलेले योगदान तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यात त्यांचे कार्य यावर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात ठाणेदार मिलिंद सरकटे यांनी प्रशासनाशी समन्वय राखून समाजात शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस पाटीलांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन केले. पीएसआय नागोराव जाधव यांनी पोलीस पाटीलांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना आवश्यक सहकार्य देण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाच्या शेवटी सेवानिवृत्त पोलीस पाटील विजय भोयर (रा. डोरली) व त्यांच्या पत्नीचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास पोलीस पाटील संघटनेचे पदाधिकारी, तालुक्यातील सर्व पोलीस पाटील तसेच पोलीस प्रशासनातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पीडित कुटुंबाला दोन लाखांचा धनादेश

प्रतिनिधी २१ जानेवारी




**महागाव :** तालुक्यातील पेढी येथील विमल रामदास ठाकरे (वय ४२) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूपूर्वी त्यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत युनियन बँक ऑफ इंडियाच्या महागाव शाखेत विमा उतरवला होता. त्यांच्या आकस्मिक निधनानंतर बँक प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करत त्यांच्या वारसांना दोन लाख रुपयांचा विमा लाभ मिळवून दिला.

महागाव शाखेच्या कर्मचाऱ्यांनी सहानुभूतीपूर्वक आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता करून विमा दाव्याचा पाठपुरावा केला. त्यामुळे अल्पावधीतच संबंधित कुटुंबाला आर्थिक मदत मिळू शकली.

या वेळी युनियन बँकेचे शाखा व्यवस्थापक किरण सावळे, सहाय्यक शाखा व्यवस्थापक प्रमोद दुधाडे, ग्रामविकास अधिकारी सतीश कुबडे, दिलीप सिरतावार, वरिष्ठ लिपिक विनोद दुधे, संदीप वांगेकर, हनुमान इंगळे, गणेश पुरी, ऋषिकेश वांगेकर तसेच ग्राहक सेवा संचालक गोपाल कासार व दिलीप जाधव यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेबाबत जनजागृती केली.

या जनजागृतीमुळे बँकेच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये बचत गटातील महिला व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने जीवन ज्योती विमा योजना स्वीकारली आहे. केवळ ४३६ रुपयांमध्ये दोन लाखांचा जीवन विमा तसेच २० रुपयांत प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत दोन लाखांचा अपघाती विमा उपलब्ध असल्याने प्रत्येक नागरिकाने या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन शाखा व्यवस्थापक किरण सावळे यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे सौंदर्यीकरण करा : भीम आर्मी आजाद समाज पार्टी

प्रतिनिधी २१ जानेवारी

**पुसद :** पुसद शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा व सभोवतालचा परिसर मोकळा करून नियोजनबद्ध सुशोभीकरण करण्यासाठी आवश्यक निधी तत्काळ उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) ने केली.

या मागणीसाठी सादर करण्यात आलेले निवेदन नगराध्यक्षा मोहिनी नाईक यांना दिले गेले. निवेदनात सांगितले आहे की, डॉ. आंबेडकर हे संपूर्ण देशाचे संविधान शिल्पकार असून त्यांच्या स्मारकाचा सन्मान राखणे प्रशासनाचे सामाजिक



आणि नैतिक कर्तव्य आहे. तरीही अद्याप ठोस कार्यवाही झाली नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली. सध्या पुतळ्याभोवतीचा परिसर अव्यवस्थित असल्याने पुतळ्याच्या सौंदर्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे परिसर स्वच्छ, मोकळा व सुशोभित करण्यासाठी निधी तात्काळ मंजूर करावा, अशी ठाम मागणी निवेदनात करण्यात आली. यावेळी भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष अशोक भालेराव, आजाद समाज पार्टी (कां.) युवा जिल्हाध्यक्ष राजकुमार भगत, युवा महासचिव विशाल डाके यांच्यासह राहुल धुळे, रवी वागमारे, रोहन जोगदंडे, संदीप सिंग, सूरज खिलारे, केतंक खंदारे, रोहन राऊत, शुभम गेले, रविराज कोल्ले, अजय लोखंडे, वैभव सूर्यवंशी तसेच भीम आर्मीचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# चिमुकल्यांचे उडानपुलाजवळ आंदोलन

प्रतिनिधी २१ जानेवारी

**पांढरकवडा :** तालुक्यातील केळापूर गावाच्या बाहेर सुरू असलेल्या उडानपुलाच्या बांधकामामुळे शाळकरी मुलांची मोठी गैरसोय होत आहे. उडानपूल गावाबाहेर उभारला जात असल्याने मुलांना थेट रस्ता ओलांडता येत नाही. त्यामुळे त्यांना शाळेत जाण्यासाठी सुमारे २०० मीटर पायी जाऊन पुन्हा २०० मीटरचा फेरा मारावा लागत आहे. यामुळे लहान मुलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर चिमुकल्या विद्यार्थ्यांनी गावातून फेरा काढत उडानपुलाजवळ तीव्र आंदोलन केले. “आम्हाला अंडरपास द्या, अन्यथा उडानपूल नकोच,” अशी ठाम मागणी विद्यार्थ्यांनी केली. यापूर्वी ग्रामसभा, निवेदने व भेटी होऊनही मागणी मान्य न झाल्याने ग्रामस्थ संतप्त आहेत.

# जीवन केवळ भौतिक अस्तित्व नाही तर सन्मानाने जगण्याचा अधिकार : अलताफ हुसेन

प्रतिनिधी २१ जानेवारी

**उमरखेड :** गरिबी, असमानता, जातीय भेदभाव, लिंगभेद, बेरोजगारी, बेघरपणा आणि आरोग्य सेवांचा अभाव यांसारख्या समस्या लाखो लोकांना सन्माननीय जीवनापासून वंचित ठेवत आहेत. जीवनाचा हक्क कायदेशीररित्या हमी दिलेला असला तरी, प्रत्यक्षात तो फक्त भौतिक जगणे पुरते मर्यादित राहतो. सन्मान, आदर आणि प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार हाच खरा जीवनाचा अर्थ आहे.

अलताफ हुसेन यांनी जीवनाचा अधिकार - सम्मानाने या अभियानांतर्गत हॉटेल नंदी येथे आयोजित चर्चासत्रात हे विचार



मांडले. या कार्यक्रमात नागरिकांना खरोखर प्रतिष्ठेने जगता येत आहे का? गरीब, दलित, अल्पसंख्याक आणि महिलांना रोज कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागतो? महिला हिंसा, भेदभाव, असुरक्षा, संविधानाने दिलेले अधिकार, सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक असमानता आणि प्रशासकीय सेवांमधील अडचणी यावर सखोल चर्चा झाली.

या अभियानाचा मुख्य उद्देश जीवनाचा अधिकार आणि प्रतिष्ठा या संकल्पनांबद्दल नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, उपेक्षितांचा आवाज मुख्य प्रवाहात आणणे आणि सार्वजनिक सहभागाद्वारे संवैधानिक मूल्ये मजबूत करणे असल्याचे फेरोज अन्सारी यांनी प्रास्ताविकात सांगितले. छत्रपती संभाजी नगर येथे 1 फेब्रुवारी 2026 रोजी तपाडिया नाट्यगृह येथे होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनात सहभागी होण्याचे आवाहन एमपीजे शहराध्यक्ष मोहसीन राज यांनी केले.


# शेतकरी कुटुंबाला न्याय द्यावा

## 27 जानेवारीपासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण

प्रतिनिधी २१ जानेवारी

**महागाव :** डोंगरगाव (ता. महागाव) येथील बौद्ध समाजातील शेतकरी विमल बबन हाडशे व हिरामण शंकर हाडशे यांच्या जमिनीच्या व्यवहाराबाबत फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. संबंधितांवर ॲट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत, या मागणीसाठी 27 जानेवारी 2026 पासून महागाव तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते सय्यद मुदसिर सय्यद जमाल यांनी दिली.

हाडशे कुटुंबीयांच्या नावावरील भोगवटदार क्रमांक दोनची जमीन एकत्र करून ती इतर व्यक्तींना विकली गेल्याचा दावा करण्यात येत आहे. संबंधित व्यवहारात कुटुंबीयांना



अत्यल्प मोबदला देण्यात आल्याचा आरोप असून, पुढे हीच जमीन मोठ्या किंमतीत एका खासगी कंपनीला विकण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

डोंगरगाव येथील सर्वे क्रमांक 138, क्षेत्रफळ 4.00 हेक्टर या जमिनीवर गिट्टी क्रशर प्रकल्प सुरू असल्याचेही सांगण्यात आले. सदर प्रकरणात दलित शेतकरी कुटुंबीयांचे नुकसान झाले असून, त्यांना न्याय मिळावा, तसेच संबंधित प्रकल्पाची चौकशी करून कारखाना तात्काळ बंद करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात विभागीय आयुक्त, अमरावती यांना निवेदन देण्यात आले असून, शासकीय व निमशासकीय अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या प्रकारामुळे शेतकरी हिरामण हाडशे यांची प्रकृती खालावल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

न्याय न मिळाल्यास 27 जानेवारीपासून तहसील कार्यालयासमोर शांततामय मार्गाने आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणात संबंधित व्यक्ती, कंपनी तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांना निवेदनामध्ये गैरअर्जदार म्हणून नमूद करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि. २१ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र आता घरबसल्या मिळणार

**वाशिम :** जिल्ह्यातील नागरिकांसाठी चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्याची सेवा आता पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम यांच्या कार्यालयामार्फत पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. या सेवेमुळे प्रमाणपत्र घरबसल्या ऑनलाईन स्वरूपात मिळणार असून, यासाठी नागरिकांना पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथे प्रत्यक्ष येण्याची आवश्यकता राहणार नाही. याबाबत माहिती देताना पोलीस अधीक्षक, वाशिम अनुज तारे यांनी सांगितले की, या ऑनलाईन सेवेमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचणार असून प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व जलद होणार आहे. तसेच जिल्हा प्रकल्प प्रमुख (आपले सरकार) सौरभ जैन यांनी सांगितले की, नागरिकांनी चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथे प्रत्यक्ष येऊ नये. नागरिकांनी आपले सरकार पोर्टल किंवा नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र / सीएससी सेंटर मार्फत तसेच घरबसल्या ऑनलाईन अर्ज केल्यास, ठराविक कालावधीत चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येईल.https://pcs.mahaonline.gov.in/Forms/Home.aspx या संकेतस्थळावर लॉगीन करून जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या ऑनलाईन सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

व्हा दक्ष, द्या लक्ष वाचवा वृक्ष...

# भ्रष्टअधिकाऱ्यांनो, भ्रष्टाचार सोडा... वृक्षा ऐवजी आम्हाला तोडा !

## * वृक्ष वाचवा, वृक्ष जगवा हो , वृक्षतोड करू नका हो
## * 'इको ग्लोबल वेलफेअर'च्या वतीने सागर कोकास यांचा आर्त टाहो



• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •






एकीकडे वृक्षरोपणाच्या नावाखाली वृक्षारोपण केले जात नाही. तर दुसरीकडे विकासाच्या नावाखाली वृक्ष तोडल्या जात आहे. त्यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे. वाशीम शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ च्या दुतर्फा उभे असलेले जुने, भव्य आणि वारसारूप वृक्ष वाचवण्यासाठी शहरातील नागरिक आणि पर्यावरणप्रेमी संघटना 'इको ग्लोबल वेलफेअर' एकत्र आले असून, विकासासोबत पर्यावरण संरक्षणाचा सकारात्मक आणि जबाबदार संदेश दिला जात आहे. यासाठी सागर कोकास यांनी पुढाकार घेतला असून वृक्ष वाचविण्यासाठी व वृक्ष जगविण्यासाठी व शहराच्या विकासासाठी, स्वच्छ शहर ग्रीन शहर यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.भ्रष्टअधिकाऱ्यांनो, भ्रष्टाचार सोडा हो वृक्ष तोडण्याआधी आम्हाला तोडा हो असे अनोखे आंदोलन करण्यात येत आहे.

महामार्गाच्या कामाच्या अनुषंगाने प्रस्तावित वृक्षतोडीबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर, इको ग्लोबल वेलफेअरने प्रशासनाशी संवाद साधत पर्यावरणपूरक विकासाचा मार्ग अवलंबावा, अशी विनंती केली आहे. संघटनेचे स्थापक स्वप्निल गव्हाळे आणि सह-स्थापक सागर कोकस यांनी या विषयावर समतोल आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडली आहे. संघटनेने स्पष्ट केले आहे की, हे वृक्ष वाशिमच्या पर्यावरणीय समतोलाचे रक्षक असून, प्रदूषण नियंत्रण, तापमान संतुलन आणि शहराच्या सौंदर्यात मोलाची भर घालतात. यासोबतच, हे वृक्ष पक्षी, कीटक व स्थानिक जैवविविधतेसाठी सुरक्षित आश्रयस्थान ठरत आहेत.स्वप्निल गव्हाळे म्हणाले, 'विकास आवश्यक आहे, पण तो निसर्गाशी सुसंगत असला पाहिजे. पर्यायी रस्ते रचना, तांत्रिक बदल किंवा नियोजनपूर्वक वृक्ष प्रत्यारोपण करून विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखता येऊ शकतो.'सागर कोकस यांनी सांगितले, 'हे वृक्ष केवळ सावली देणारे नाहीत, तर वाशिमच्या ओळखीचा आणि वारशाचा भाग आहेत. नागरिकांच्या सहभागातून त्यांचे संरक्षण होणे ही शहरासाठी अभिमानाची बाब आहे.'दरम्यान, संघटनेच्या वतीने नागरिकांच्या सह्या व छायाचित्रांसह जनहित निवेदन तयार करण्यात आले असून, मोठ्या संख्येने वाशिमकरांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त पाठिंबा दिला आहे. हा उपक्रम प्रशासन आणि नागरिक यांच्यातील सकारात्मक संवादाचे उदाहरण ठरत आहे.

हरित वाशिमकडे एक पाऊल इको ग्लोबल वेलफेअरच्या या पुढाकारामुळे वाशिममध्ये विकास आणि पर्यावरण संरक्षण एकत्र नांदू शकते, हा विश्वास अधिक बळकट होत आहे. नागरिकांचा सहभाग, प्रशासनाचा संवाद आणि संघटनांचा अभ्यासपूर्ण दृष्टिकोन यामुळे शहराच्या हरित भविष्यासाठी नवी दिशा मिळत आहे.

एकीकडे वृक्षारोपण केले जात नाही, वृक्षारोपण केले तर वृक्ष जगविले जात नाही अशी स्थिती असतांना विकासाच्या नावावर वृक्षतोड केली जात आहे. रस्ता चौपदरी होण्याऐवजी दुपदरी होत असून निकृष्ट दर्जाचा होत आहे. त्यामुळे या रस्त्याची चौकशी करून वृक्षतोड थांबविण्यासाठी आंदोलन करणार असल्याचे सागर कोकास यांनी सांगितले.

### शहराच्या विकासासाठी रस्त्यावर उतरणार -कोकास

शहरातील रस्ते १२ वर्षात पाच वेळा करूनही नागरिकांचे जीवन खड्ड्यातच गेले आहे. आता रस्ते विकासाच्या नावाखाली वृक्षतोड सुरू आहे. वृक्ष लावणे सोडा जगविणे ही होत नाही. त्यामुळे शहराच्या विकासासाठी व वृक्ष वाचविण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे सागर कोकास यांनी सांगितले.


वाशीम Express
शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५
फोकस
मुख्यमंत्री साहेब तुम्हच्यामुळे...
तातपुरते रस्ते दुरूस्त !
* भ्रष्टाचार करून भ्रष्टाचारी मस्त, नागरिक त्रस्त

शनिवार दि. २९ नोव्हेंबर २०२५
वाशीम शहरातील मुख्य रस्ते रातोरात हातोहात...
मुख्यमंत्री साहेब रोजच या हो, वाशीम शहराचा विकास करा हो !
* सागर कोकास यांचा आर्त टाहो...

शनिवार दि ६ डिसेंबर २०२५
वाशीम शहरातील मुख्य रस्ते रातोरात हातोहात...
मुख्यमंत्री साहेब आले, सागर कोकासने आंदोलन केले, रस्त्याचे काम सुरू झाले !
बातम्या खास, दखल हमखास, सिटी न्युज सुपरफास्ट

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
निमंत्रण आंदोलन
गुरुवार दि. ११ डिसेंबर २०२५
वाशीम शहरातील मुख्य रस्ते रातोरात हातोहात...
मुख्यमंत्री साहेब रोजच या हो, शहरातील रस्ते करा हो !
* सागर कोकास यांचा आर्त टाहो...

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
निमंत्रण आंदोलन
शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५
मुख्यमंत्री २ उपमुख्यमंत्री ३३ कॅबीनेट मंत्री ६ राज्यमंत्री २८८ आमदार...
सर्व जण वाशीमला याहो, शहर पाहा हो अन् विकास करा हो !

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
निमंत्रण आंदोलन
गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५
वाशीम शहरातील रस्ते रातोरात, हातोहात...
बावनकुळे साहेब या हो, शहरातील रस्ते करा हो !
पाटणी चौक मार्गाने जावून महाराजाना हार अर्पन करा हो

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि. १२ जानेवारी २०२६
व्हा दक्ष, द्या लक्ष वाचवा वृक्ष...
वृक्ष वाचवा, वृक्ष जगवा हो
वृक्षतोड करू नका हो..!
'इको ग्लोबल वेलफेअर'च्या वतीने सागर कोकास यांचा आर्त टाहो
शहराच्या विकासासाठी रस्त्यावर उतरणार -कोकास

## थोडक्यात

### आज स्वराली वाणी चे श्री.गुरुमंदिर येथे प्रवचन

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथील कला शाखेच्या प्रथम वर्षाची विद्यार्थिनी स्वराली वाणी या आपल्या साहित्यिक, प्रवचन आणि नाट्यकलेतील कार्यामुळे विशेष चर्चेत आहेत.एक लेखिका,



प्रवचनकार तसेच छोटीशी नाट्यकर्मी अशी ओळख असलेल्या स्वराली वाणी या मराठी भाषेच्या माध्यमातून आपली सांस्कृतिक परंपरा जपण्याचे कार्य करीत आहेत.गेल्या दोन वर्षांपासून त्या आपल्या श्री.गुरूमंदिरात नियमितपणे व्याख्यान सेवा देत असून यावर्षीही त्यांनी आपली व्याख्यान सेवा सुरू ठेवली आहे.दिनांक २१ रोजी सायंकाळी ७ वाजता 'मला समजलेले श्रीराम आणि रामरक्षा' या विषयावर त्या व्याख्यान देणार असून या कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, स्वराली वाणी यांनी ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी कविता पाठवली होती. विशेष म्हणजे त्यांच्या कवितेची निवड झाल्याचे पत्र त्यांना प्राप्त झाले आणि देशातील इतक्या मोठ्या साहित्यिक व्यासपीठावर कविता सादर करण्याची संधी त्यांना मिळाली. 'गड्या शेती बी सोपी नाय' या शीर्षकाची ही कविता विदर्भातील शेतकरी कुटुंबाची व्यथा मांडणारी असून, शेतीकडे केवळ वरवर पाहणाऱ्या शहरी मानसिकतेला प्रश्न विचारणारी आहे. या उद्देशाने लिहिलेल्या या कवितेचे साहित्य संमेलनात सादरीकरण करताना आपल्याला विशेष आनंद झाल्याची भावना स्वराली वाणी यांनी व्यक्त केली. तरुण वयात साहित्य, संस्कृती आणि सामाजिक वास्तव मांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्वराली वाणी यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून भविष्यात त्यांच्या लेखन व प्रवचन कार्याकडून अधिक भरीव योगदानाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पिंप्री अवगण येथे आनंद मेळावा आनंदात साजरा



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

परमहंस झोलेबाबा विद्यालय येथे आनंद मेळावा सर्व विध्यार्थ्यांनी मिळून आनंदात साजरा झाला. वर्ग पाच ते बारावी च्या सर्व विध्यार्थ्यांनी अतिशय उत्सपूर्धपणे सहभाग घेऊन वर्गनिहाय वेगवेगळ्या प्रकारचे खाऊ बनवून शाळेतील विध्यार्थ्यांना त्यांनी एक मेजवानीच दिली. या कार्यक्रमासाठी खासकरून प्रोत्साहन देणारे संस्थेचे सचिव तथा प्राचार्य सुनिलजी सपकाळ यांचा फार मोठा मोलाचा वाटा आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुलांना भविष्यात लघुउद्योग कसा करावा हे शिकायला मिळाले हाच पवित्र हेतू लक्षात ठेऊन श्री सुनिलजी सपकाळ यांनी हा कार्यक्रम करण्यासाठी मुलांचा मार्ग मोकळा करून दिला. या कार्यक्रमासाठी काही पालकवर्ग ही उपस्थित होते त्यामध्ये श्री दिलीपराव अवगण, मुख्य संपादक दिलिप अवगण यांची खासकरून उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी कारण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री सुशील सपकाळ सर तथा सर्व कर्मचारी वर्ग झटत होते. त्यामध्ये राठोड , गोगे , शिंगणे , गोरवे , भुसारी , गौपाल , दीक्षित , कुलकर्णी , चेतन , अवगण , लांभाडे , संतोष सर तसेच शाळेचे सेवक सतीश ग्याने हजर होते.

### मिल बाटके धोरण, बदले राजकारण...

# वाशीम न.प.विषय समिती निवडीचे समिकरण !

## भाजपाकडे ३, तर उध्दव सेनेकडे २ सभापती पदे

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशिम नगर परिषदेत भाजप आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट यांच्यात समन्वय दिसून आला आहे. २० जानेवारी रोजी झालेल्या सभापती व समिती निवडीत सर्व पदे बिनविरोध निवडून आल्याने नगर परिषदेत नवे राजकीय चित्र समोर आले आहे.

सभापती व विविध समित्यांच्या निवडीत दोन्ही पक्षांनी एकमेकांविरुद्ध उमेदवार न उभे करता सत्तेचे वाटप केले आहे. भाजपकडे सार्वजनिक बांधकाम, शिक्षण व नियोजन समितीची जबाबदारी देण्यात आली आहे. राहुल तूपसांडे यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम, कुणाल हेडा यांच्याकडे शिक्षण तर सौ. अरुणा वाटाणे यांच्याकडे नियोजन समिती देण्यात आली आहे.

शिवसेना (उबाठा) गटालाही सत्तेत सहभाग देण्यात आला असून राजूभाऊ भांदुर्गे यांची नगर परिषद उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्याकडे आरोग्य खाते देण्यात आले आहे. तसेच वर्षा हजारे यांच्याकडे पाणीपुरवठा,



गोकुळाबाई इंगोले यांच्याकडे महिला व बालकल्याण सभापतीपद देण्यात आले आहे. पूजा विशाल काळे यांची उपसभापतीपदी निवड झाली आहे.

दरम्यान, स्थायी समितीवर भाजपचे अनिल ताजने, जयश्री वानखेडे आणि शिवसेना (उबाठा) गटाचे साबीर मिर्झा यांची बिनविरोध निवड झाली आहे.वाशिम नगर परिषदेत झालेल्या या निवडीतून दोन्ही पक्षांमध्ये सत्तेसाठी समन्वयाची भूमिका असल्याचे चित्र स्पष्ट झाले आले. आता यापुढे मिलबाटके सांस्कृतीचे धोरण अवलंबून राजकारण होणार असल्याचे दिसत आहे.

### न.प.मधील चित्र, 'यु-घाडी' विचित्र...

निवडणुकीत विरोधात लढा , कार्यकर्त्यांनी भांडण करा, आयुष्यभराच्या दुश्मन्या घ्या, निवडणुकीत टोकाचा संघर्ष करा, मात्र विजयी झाल्यावर सत्तेसाठी एकत्र या असे चित्र वाशीम नगर पालिकेत दिसून आले आहे. त्यामुळे वाशीम नगर पालिकेतील हे चित्र आघाडी आणि युतीची 'यु-घाडी' विचित्र झाली आहे.

## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना योजनांचा लाभ देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करावे -ॲड.निलेश हेलोंडे

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मानोरा तालुक्यातील इंझोरी येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश पाटील हेलोंडे यांनी सोमवारी १९ सांत्वनपर भेट घेतली. या कुटुंबांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर, त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ तातडीने वेळेवर मिळवून देण्याचे निर्देश त्यांनी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले. मानोरा तालुक्यातील इझोरी येथील डिगांबर गजानन इंगळे व शाम तुळशीराम शिंदे या दोन शेतकऱ्यांनी काही वर्षांपूर्वी नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली



होती. या कुटुंबांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी ॲड हेलोंडे यांनी प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन भेट दिली.

यावेळी ॲड हेलोंडे यांनी स्व. शाम शिंदे यांच्या पत्नी संगीता शिंदे, त्यांच्या दोन मुली व मुलगा, तसेच स्व. डिगांबर इंगळे यांच्या पत्नी शितल इंगळे व त्यांच्या मुलांशी सविस्तर चर्चा केली. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची साधने आणि मुलांच्या शिक्षणाबाबत त्यांनी आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

## जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचा समारोप

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मागील ३ दिवसापासुन जिल्हा परिषदेच्याअधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप सोमवारी रात्री सायंकाळी ९.३० वाजता झाला. वाशिम जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, मुख्य लेखा वित्त अधिकारी योगेश क्षीरसागर, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद गणविर, ? जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशिल पाटील, कारंजा गट विकास अधिकारी पुनम राणे, उप शिक्षणाधिकारी गजानन




डाबेराव, वाशिम पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने आदिंची मंचावर उपस्थिती होती.

या स्पर्धांमध्ये विविध मैदानी व इनडोअर क्रीडा प्रकारांमध्ये सर्व पंचायत समिती आणि मुख्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षिस वितरण करण्यात आले.

**क्रीडा स्पर्धेतील विजेते स्पर्धक:**

बुध्दीबळ स्पर्धेत मुख्यालयाचे आशिष हिरेखण यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. कारंजा पंचायत समितीचे विनोद ठोंबे हे उपविजेते ठरले. बुध्दीबळ महिला दिव्यांग मध्ये उज्वला देबाजे प्रथम तर मंगरुळपीर पंचायत समितीच्या कल्पना मुळे या उपविजेत्या ठरल्या. लांब उडी स्पर्धेत पुरुष गटात प्रदीप सदर (रिसोड) व गणेश शिंदे (वाशिम), तर महिला गटात ?वैशाली दहीभात (मुख्यालय) व मंगल गोडसे (रिसोड) यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावले. उंच उडी स्पर्धेत पुरुष गटात गोविंद हरणे (मंगरूळपीर) व नविन तिडके (मुख्यालय), तर महिला गटात शिवानी भालेराव (रिसोड) व सुनिता सोळंके (मालेगाव) यांनी यश संपादन केले.

# रिसोड शहराच्या आरोग्याचा कारभार शिंदे सेनेच्या हाती !

## *आरोग्य व शिक्षण सभापतीपदी संतोष चऱ्हाटे *तर दोन समित्यांचा कारभार 'लाडक्या बहिणींच्या' हाती

• वसंत खडसे @ वाशीम •

जिल्ह्याची राजकीय राजधानी म्हणून ओळख असलेल्या रिसोड येथील नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष निवडणुकीनंतर शहरवासीयांचे विषय समित्यांकडे लक्ष लागले होते. त्या काल दि. २० जानेवारी रोजी जाहीर करण्यात आल्या. बिनविरोध पार पडलेल्या चार विषय समित्यांपैकी आरोग्य व शिक्षण सभापतीपदी संतोष चऱ्हाटे यांची निवड करण्यात आली. परिणामी शहराच्या आरोग्याचा कारभार शिंदे सेनेच्या हाती आल्याने शहरवासीयांमधून संतोष जनक जनभावना व्यक्त होत आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या रिसोड नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत महायुतीचे भगवानराव क्षीरसागर यांना शहरवासीयांनी नगराध्यक्षपदी विराजमान केले आहे. तर महायुतीच्या संख्याबळानुसार शिंदे सेनेच्या प्रभावी नेत्या तथा विधान परिषद सदस्य आ. भावनाताई गवळी यांच्या गटाचे विष्णु कदम पाटील हे उपनगराध्यक्षपदी विराजमान झाले आहेत. मात्र शहराच्या विकासासाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या विषय समित्यांची निवड बाकी असल्याने कोणत्या समितीवर कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता लागली होती. अखेर काल चार



समित्यांची निवड करण्यात आली. यात भाजपच्या माधुरी स्वप्नील ईरतकर यांची बांधकाम समितीच्या सभापती तर शामली सागर डांगे यांची उपसभापती म्हणून निवड करण्यात आली आहे. महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी जया नकवाल यांची वर्णी लागली आहे. तर पाणीपुरवठा समितीचे सभापती म्हणून संजय बागडिया विराजमान झाले आहेत.

शहराच्या आरोग्याचा कारभार आ. भावनाताई गवळी यांचे शिलेदार संतोष चऱ्हाटे यांच्याकडे सोपविण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. एकंदरीत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या विषय समित्यांची निवड बिनविरोध झाल्याने शहराच्या विकासाला नक्कीच चालना मिळेल अशा भावना शहरवासीयांमधून व्यक्त केल्या जात आहेत.

### आरोग्यासाठी ' नो ' हेलपाटे, कारण तिथे आहे संतोष चऱ्हाटे..

नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीत संतोष चऱ्हाटे सलग दुसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. याआधी त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मीराताई संतोष चऱ्हाटे यांनी विविध विषय समित्यांचे सभापतिपद प्रामाणिकपणे व जबाबदारीने सांभाळले आहे. पहिल्याच टर्ममध्ये नगरसेवक म्हणून पत्नी सौ. मीराताई चऱ्हाटे निवडून आल्यानंतर संतोष चऱ्हाटे यांनी सोशल मीडियावर ' तक्रार निवारण ' ग्रुप निर्माण करून सर्व सामान्य लोकांना अडचणी मांडण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले होते. त्यांचा हा अफलातून प्रयोग कमालीचा यशस्वी झाल्याने संतोष चऱ्हाटे हे नाव एक नगरसेवक म्हणून नव्हे; तर खराखुरा ' जनसेवक ' म्हणून प्रकाशझोतात आले आहे. याच बळावर चऱ्हाटे दुसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले असल्याची चर्चा रिसोड शहरात ऐकावयास मिळत आहे. शिंदे सेनेच्या प्रभावी नेत्या तथा विधान परिषद सदस्य आ. भावनाताई गवळी यांचे पाठबळ मिळाल्याने या उमद्या जनसेवकाची ऊर्जा आता अधिक वाढली असून त्यांच्याकडे सोपविण्यात आलेला शिक्षण व आरोग्याच्या कारभारात निश्चितच नवनवीन सुधारणा होतील अशी अपेक्षा सर्व सामान्य नागरिक व्यक्त करीत आहेत. शहरवासीयांच्या आरोग्याची काळजी सभापती संतोष चऱ्हाटे निर्विवादपणे सांभाळणार ! यात कुणाचेही दुमत नसल्याचे सर्व सामान्य नागरिक बोलत आहेत. तर आरोग्याच्या समस्यासाठी आता ' नो ' हेलपाटे कारण तिथे आहे संतोष चऱ्हाटे ! असे गोरगरीब लोक छातीठोकपणे बोलत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मनपात महापौर, उपमहापौर कक्षांचे सुशोभीकरण

प्रतिनिधी २१ जानेवारी

♦ युद्ध स्तरावर कक्षांची दुरुस्ती ♦ आतापर्यंत सर्व कक्ष होते टाळे बंद





**अकोला :** मागील तीन साडेतीन वर्षापासून महापालिकेतील महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सत्तापक्ष नेते, विरोधी पक्षनेते तसेच विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचे कक्ष कुलबंद असल्याने या सर्व कक्षांमध्ये धुळीचे साम्राज्य पसरले होते. भिंतींच्या रंगांचे पापुद्रे उडाल्याचे दिसून येत आहे. तसेच कोळ्यांची जाळी सुद्धा सर्वत्र दिसून येत आहेत. महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांची ही सर्व दालने अक्षरशः भंगारखाने बनली होती. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष आदींच्या खुर्च्यांची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे मनपाला दुरुस्तीवर मोठा खर्च करावा लागणार आहे, प्रशासनाच्या कुलूपबंद कारभारामुळे ठेकेदारांचे मात्र चांगभले होत आहे. नवीन महापौरांसह अन्य पदाधिकाऱ्यांचा लवकरच महापालिकेत कारभार सुरू होणार असल्याने, निविदा न काढता दुरुस्तीची कामे युद्ध पातळीवर सुरू करण्यात आली आहेत. महापालिकेच्या बांधकाम विभागाचे म्हणणे आहे की या सर्व पदाधिकाऱ्यांच्या कक्षांची डीप क्लिनिंग करण्यावर विशेष लक्ष दिले जात आहे, या कक्षांना रंगरंगोटीचे काम सुरू करण्यात आले आहे. ज्या ठिकाणी प्लास्टर पडले होते त्या ठिकाणी प्लास्टर लावले जात आहे. महापौरांच्या कक्षातील स्वच्छतागृहाची सुद्धा सफाई केली जात आहे. तसेच झुरळ व उंदरांसाठी पेस्ट कंट्रोल सुद्धा या कक्षात करावी लागणार आहे. कक्षातील लाइटिंग ची वायर बदलणे, प्लंबिंग चे काम आदी कामे करावी लागतील. त्यासाठी मोठा खर्च येण्याची शक्यता आहे. जर आधीच महापालिका प्रशासनाने वेळोवेळी या सर्व कक्षांची दुरुस्ती केली असती, तर महापालिकेला या कक्षांच्या दुरुस्तीवर इतका खर्च करावा लागला नसता. परंतु न्यायालयाच्या निर्णयानंतर अचानकच निवडणुका जाहीर झाल्याने महापालिकेचे सर्व कर्मचारी निवडणुकीच्या कामात व्यस्त होते. आता निवडणुका संपल्यानंतर महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सदस्य आधी पदाधिकाऱ्यांचे कक्ष चकाचक ठेवण्यासाठी महापालिकेला युद्ध स्तरावर या सर्व कक्षांचे सुशोभीकरण करण्याची वेळ आली आहे

# स्वीकृत सदस्य निवडीसाठी सुद्धा होणार पैशांचा खेळ

प्रतिनिधी २१ जानेवारी

♦ स्वीकृत सदस्य पदासाठी मोठी चढाओढ



**अकोला :** अकोला महापालिका निवडणुकीचा निकाल लागला असून निवडणुकीआधी तिकीट न मिळालेल्या उमेदवारांनी बंडखोरी करू नये, म्हणून त्यांना शांत करण्यासाठी सर्वच पक्षांनी स्वीकृत नगरसेवक पदाचे आश्वासन दिले होते. विशेषता भाजपामध्ये नाराजांची संख्या मोठी होती. नाराज कार्यकर्त्यांना स्वीकृत नगरसेवक पदाचे जे आश्वासन दिले होते, ते आता भाजपा नेत्यांच्या अंगलट येण्याची चिन्हे आहेत. अकोला महापालिकेत एकूण आठ स्वीकृत नगरसेवक निवडून येतील ज्यामध्ये संख्याबळाचा विचार करता भाजपाचे स्वीकृत सदस्य जास्त राहतील. मात्र राजकीय पक्षांच्या गटांची कशी रचना होते यावरच स्वीकृत सदस्य संख्या निवडीचे गणित जुळणार आहे. सध्या राजकीय अंदाजानुसार अगोदर महापौरांची निवड होईल.

रिक्त जागांची मर्यादित संख्या आणि इच्छुकांची लांबलचक रांग पाहता कोणाची निवड करायची यावरून पक्षांतर्गत संघर्ष होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वास्तविक पाहता प्रशासकीय कामकाजात विविध क्षेत्रातील तज्ञ आणि अनुभवी व्यक्तींचा सल्ला मिळावा, या हेतूने महापालिकेत स्वीकृत सदस्यांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र गेल्या काही वर्षात या पदाचा वापर केवळ नाराज कार्यकर्त्यांचे राजकीय पुनर्वसन करण्यासाठी केला जात असल्याचे चित्र आहे. या सदस्यांना सभागृहात मतदानाची मुभा नसते आणि ते महत्त्वाच्या पदांवर दावा करू शकत नाहीत. तरीही महापालिकेत पालिकेत आणि आपल्या प्रभागात मानाचे स्थान मिळत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये या पदासाठी मोठी चढाओढ सुरू असल्याचे पहावयास मिळत आहे. विशेषता ज्यांचा व्यवसायच केवळ राजकारण आहे, अशांनी स्वीकृत सदस्य होण्यासाठी आपला खिसा हलका करण्यास सुरुवात केली आहे. महापालिका निवडणुकीत विरोधी पक्षात अनेक पैलवान, तसेच दादा लोक निवडून आल्याने, त्यांना सभेत रोखण्यासाठी भाजपाला सुद्धा तशाच प्रवृत्तींची आवश्यकता असल्याने विविध क्षेत्रातील तज्ञ आणि अनुभवी व्यक्ती ऐवजी पहिलवान आणि दादा लोकांचीच वर्णी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अनेकांनी तर आपण स्वीकृत सदस्य म्हणून निवडून येणार असल्याची ग्वाही आपल्या कार्यकर्त्यांना दिली आहे. त्यामुळे महापौर निवडीनंतर स्वीकृत सदस्य पदी कोणाची वर्णी लागते याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे

# मनपा निवडणुका संपल्या: शहरातील जुगार अड्डे सुरू होण्याच्या हालचाली

प्रतिनिधी २१ जानेवारी



**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर शहरातील सर्व बेकायदेशीर धंदे बंद करण्यात आले होते. यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला, तर दुसरीकडे वरली व जुगार अड्डे चालकांची मात्र तडफड सुरू होती. महापालिका निवडणुका पाहता शहरातील सर्वच जुगार अड्डे बंद करण्याचे निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिले होते. परंतु आता महानगरपालिका निवडणुका संपल्या आहेत, त्यामुळे बेरोजगार झालेले शहरातील जुगार अंडे चालविणारे अधिक सक्रिय झाले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जुगार अड्डे चालकांनी पोलिस अधिकाऱ्यांना त्यांचे क्लब पुन्हा सुरू करण्यासाठी परवानगी मागण्यास सुरुवात केली आहे. काही ठिकाणी तर वरली अड्डे सुरू झाले आहेत. एकीकडे जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक ऑपरेशन प्रहार अंतर्गत बेकायदेशीर धंद्यांवर कारवाई करत असताना, त्यांचे अधीनस्थ अधिकारी मात्र या बेकायदेशीर धंद्यांना परवानगी देऊन शहरातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत. हे पाहता शहरातील सर्व जुगार अड्डे पूर्ववत बंद ठेवण्याचे निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षकांनी द्यावेत अशी मागणी शहरातील नागरिक करीत आहेत

# अकोल्यात आजपासून वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सव

प्रतिनिधी २१ जानेवारी



**अकोला :** सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने प्रमिलाताई ओक हॉल, अकोला या ठिकाणी दि. २१आणि २२जानेवारी २०२६ रोजी साय ६:३० वा. सांस्कृतिक कार्यक्रम वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दिनांक २१ रोजी सायंकाळी ६:३० वाजता प्रसिद्ध बंजारा नृत्य सादर होणार असून सादरकर्ता कला संघ हा बार्शीटाकळी तालुक्यातील साखरविरा या गावातील ललिता जाधव आणि कलावंत सादर करणार आहेत. गुरुवार दि. २२ जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता.महाराष्ट्राची लोककला वासुदेव ,गौधळ,भारुड कलापथक खंडीगमत इत्यादी लोककलेचे प्रकार होणार आहेत. सादरकर्ते - शाहिर विशाल ना.राखोंडे व लोककवी सागर राखोंडे संच, साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु.मंडळ, पातुर व स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठान, पातुर या कार्यक्रमात एकूण १५ कलावंत सहभागी होणार आहे. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली तसेच विभागाचे संचालक विभीषण चवरे यांच्या नियोजनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम निःशुल्क असून या कार्यक्रमाच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सव हा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून याचा जास्तीत जास्त प्रेक्षकांनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन श्री विभीषण चवरे ,संचालक सांस्कृतिक कार्य यांनी केले आहे.

# ढगाळ वातावरणामुळे अकोलेकरांना थंडीपासून दिलासा

प्रतिनिधी २१ जानेवारी

♦ दिवसाचे तापमान रात्रीपेक्षा दुप्पट

**अकोला :** अकोला शहरात बुधवारी पहाटेपासूनच ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळे रात्रीच्या तापमानात मोठी तफावत पाहायला मिळाली. दिवसाचे तापमान रात्रीच्या तुलनेत थेट दुप्पट नोंदवण्यात आले, ज्यामुळे अकोलावासियांना कडाक्याच्या थंडीपासून काहीसा दिलासा मिळाला आहे. शहरात कमाल तापमान ३० अंश सेल्सिअस नोंदवले गेले, तर रात्रीच्या तापमानात १.८ अंशांची वाढ होऊन ते १५ अंशांवर पोहोचले. हवेतील आर्द्रता वाढल्यामुळे तापमानात ही वाढ झाल्याचे सांगण्यात येत आहे.

बुधवारी पहाटे पासूनच आकाशात ढग जमायला सुरुवात झाली. या ढगाळ वातावरणामुळे थंडीचा जोर ओसरला. रात्रीचे तापमान सरासरीपेक्षा २ अंशांनी अधिक नोंदवण्यात आले. विदर्भातील इतर शहरांची स्थिती मंगळवारी ११ अंश सेल्सिअस तापमानासह यवतमाळ विदर्भात सर्वात थंड शहर ठरले. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या खाडीत निर्माण झालेल्या 'सायक्लोनिक सकुर्लेशन'मुळे (चक्रवातीय स्थिती मध्य भारतात मोठ्या प्रमाणावर आर्द्रता प्रवेश करत आहे. तसेच उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे पावसाची शक्यता वर्तवण्यात आल आहे. २१ ते २३ जानेवारीदरम्यान उत्तर भारतात पावसाचे सावट राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे मागील दोन महिन्यांपासून थंडीने त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे

# आंबा मोहरावर रोगांचा प्रादुर्भाव

प्रतिनिधी २१ जानेवारी



**अकोला :** आंबा मोहरावर आला की त्यावर कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. सध्या जिल्ह्यात आंबा मोहरावर कोळी कीटकासह भुरी रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे मोहर गळत असल्याने मोठे नुकसान होत आहे.

जिल्ह्यात ६१ हेक्टरवर आंब्याच्या फळबागा आहेत. तसेच हजारो शेतकऱ्यांच्या शेतामध्ये आंब्याची झाडे असून, दरवर्षी गावरान आंब्याचे उत्पादन घेण्यात येते. या रोगामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानाचा सामना करावा लागणार आहे. आंब्याच्या मोहरावर येणारा भुरी हा रोग बुरशीमुळे होतो. जेव्हा आंब्याला मोहर येतो त्याचवेळी या रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असतो. भुरी रोगाच्या बुरशीची बीजे कोवळ्या मोहरावर किंवा पालवीवर उगवतात. त्यांची मुळे मोहराच्या पेशींमध्ये शिरून अन्नरस शोषतात. सुरुवातीला रोगाची लागण मोहराच्या शेंड्याच्या भागात होऊन नंतर इतरत्र पसरते. या रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात झाल्यास आंब्याच्या मोहराचे जवळपास ७० ते ८० टक्के नुकसान होऊ शकते. मोहर फुटल्यानंतर लगेच प्रादुर्भाव झाल्यास फुलांची मोठ्या प्रमाणावर गळ होते. परिणामी, फळधारणा होत नाही. सद्य परिस्थितीत ढगाळ वातावरण, थंडी, ऊन व पाऊस असा वातावरणाचा क्रम चालू आहे व तसेच आंब्याला मोहर येण्यास सुरुवात झाली आहे. सुरुवातीच्या अवस्थेत आंब्यावरील मोहरावर किडींचा व रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो, आणि या किडी अपायकारक ठरतात.

# विद्यार्थिनीच्या छळप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २१ जानेवारी

**बाळापूर :** अल्पवयीन विद्यार्थिनीला मानसिक त्रास देणे, धमकी देणे व अश्लील संदेशांच्या माध्यमातून छळ केल्याप्रकरणी दोन तरुणांविरुद्ध बाळापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी ही अल्पवयीन विद्यार्थिनी आहे. तिच्या तक्रारीनुसार, तिच्याच वर्गातील आरोपींनी मोबाइलवर वारंवार संदेश व कॉल करून छायाचित्रांची मागणी केली. तसेच कॉलेजकडे पाठलाग करून बदनामीची धमकी देत दीर्घकाळ मानसिक त्रास दिल्याचा आरोप आहे. हा त्रास १ एप्रिल २०२५ ते २० जानेवारी २०२६ या कालावधीत सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अखेर त्रास असह्य झाल्याने फिर्यादी कुटुंबीयांसह बाळापूर पोलिस ठाण्यामध्ये तक्रार दाखल करण्यासाठी आली. तिच्या लेखी तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. सदर प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक माधुरी पाटील करीत आहेत.

# श्रीमती रादेगो महिला महाविद्यालयात गुरुवारी 'बोलींचा जागर'

प्रतिनिधी २१ जानेवारी

**अकोला :** स्थानिक श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयात गुरूवारी 'बोलींचा जागर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठी भाषेच्या विविध बोलींचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्याच्या उद्देशाने तथा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त महाराष्ट्रातील विविध ३६ जिल्ह्यांमध्ये विद्यापीठस्तर आणि महाविद्यालयस्तरावर 'बोलींचा जागर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, जि. अमरावती आणि श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने 'बोलींचा जागर' या कार्यक्रमाचे आयोजन गुरूवार, दि.२२ जानेवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या दरम्यान करण्यात आले आहे. 'बोलींचा जागर' या कार्यक्रमांतर्गत सकाळी ९ ते १० शोभायात्रा/ग्रंथदिंडी आणि सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मुख्य कार्यक्रम अशा दोन सत्रात करण्यात आले आहे. 'बोलींचा जागर या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण लोककलांचे सादरीकरण, संवाद, बोली भाषा अभ्यासकांचे व तज्ञांचे मार्गदर्शन राहणार आहे. या कार्यक्रमात पारधी आणि कलारी या मराठी बोली भाषांचे भाषातज्ञ प्रामुख्याने मार्गदर्शन करणार आहेत. यात मा. प्रकाश चव्हाण, मा.डॉ.रामदास चवरे आणि मा. प्रा. भगवान डोहळे या भाषातज्ञांचा सहभाग राहणार आहे. या कार्यक्रमाचे राज्यस्तरावर निमंत्रक म्हणून मा.डॉ.उदय सामंत, मंत्री मराठी भाषा व उद्योग आणि मा.डॉ.किरण कुलकर्णी, सचिव, मराठी भाषा विभाग हे आहेत.

तर रादेगो महाविद्यालयात होणाऱ्या या कार्यक्रमाचे निमंत्रक प्राचार्य डॉ. चारुशीला रुमाले, प्राचार्य, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला आणि मा. अरुण गिते, भाषा संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य हे आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ.अविनाश आवलगावकर, कुलगुरु, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर अमरावती हे भूषविणार असून भारतीय सेवा सदनचे अध्यक्ष मा. दिलीपराज गोयनका आणि रादेगो महिला महाद्यालयाच्या प्राचार्य डॉ.चारूशिला रूमाले यांची विशेष उपस्थिती राहील. कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक मा. संतोष गोसावी, सहायक भाषा संचालक, भाषा संचालनालय, मुंबई (म.रा.) तर समन्वयक डॉ.स्वप्नील इंगोले, मराठी विभागप्रमुख, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला हे आहेत. तरी 'बोलींचा जागर' या कार्यक्रमाचा लाभ मराठी बोली भाषा प्रेमींनी घ्यावा, असे आवाहन रादेगो महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. चारूशिला रूमाले यांनी केले आहे.

# छोट्या-मोठ्या पक्षांची अस्तित्व टिकविण्यासाठी केवीलवाणी धडपड!

प्रतिनिधी २१ जानेवारी



**अकोला :** यंदाची अकोला महानगरपालिका निवडणूक अनेकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी ठरली आहे. ही निवडणूक प्रतिष्ठा आणि अस्तिव राखण्यासाठी सर्वच पक्षांनी प्राणपणाने लढली. मात्र भाजपा व काँग्रेस पक्ष वगळता एकाही पेक्षाला दोन अंकी आकडा गाठता आला नाही, हे विशेष. त्यामुळे अनेक पक्ष आपले अस्तित्व टिकविण्यासाठी केवीलवाण धडपड करताना दिसून आले. यामध्ये राष्ट्रवादी अजित पवार, शिंदेसेना यांना केवळ एक-एकच जागा मिळविता आली तर राष्ट्रवादी शरद पवार गटाने ३ जागा मिळवत आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिल्याचे या निकालावरून दिसून आले.

अकोला महानगरपालिका निवडणुकीत भाजपा-राष्ट्रवादी अजित पवार यांच्यात युती होती. भाजपाने राष्ट्रवादीला १४ जागा दिल्या असतानाही त्यांना केवळ एकच जागा मिळविता आली आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी शरद पवार गटाने काँग्रेससोबत आघाडी करून २३ जागा लढवल्या, त्यामध्ये राष्ट्रवादीचे तीन नगरसेवक निवडून आले आहेत. अकोल्यात भाजप व शिंदेसेना यांनी वेगवेगळी आपली ताकद आजमावण्याचा प्रयत्न केला. शिवसेनेने स्वबळावर सर्वाधिक ६४ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले. शिवसेनेचे मंत्री, नेते, उपनेते आदी नेते अकोल्यात तळ ठोकून होते.

खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही एक प्रचार सभा घेतली. मात्र तरीही अपेक्षित यश मिळविण्यात शिंदेसेना सपशेल अपयशी ठरली. केवळ एकमेव जागा पटाकावून कशीबशी इज्जत वाजविली.

वंचितची २०१७ च्या तुलनेत २०२६ च्या निवडणुकीत कामगिरी सरस असली तरी ५२ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवून केवळ पाच उमेदवारांना निवडून आणण्यात ते यशस्वी ठरले. शिवसेना ठाकरे गटानेही स्वबळावर ५४ उमेदवार दिले होते. काही जागांवर काँग्रेसने त्यांना पाठिंबा दिला. मात्र, अवघ्या सहा ठिकाणीच त्यांना यश मिळाले. त्यातील सुद्धा एक उमेदवार हा प्रहार पक्षाने दिलेला आहे. ओवेसीच्या दोन जाहीर सभा अकोल्यात होऊनही एमआयएम पक्षाला आपला विशेष प्रभाव पाडता आले नसल्याचे दिसून आले. केवळ तीनच जागांवर त्यांना समाधान मानावे लागले. त्यांचा सर्वाधिक प्रभाव हा मुस्लीम बहुल भागात असला तरी तो समाज काँग्रेसच्या बाजूने वळल्याचे या निवडणूक निकालावरून व काँग्रेसने पटावलेल्या जागांवरून दिसून येते.

**कोणाचे खाते निरंक तर कोणाचे डिपॉझीट गोल!**

ही मनपा निवडून अनेकार्थ धडा शिकविणारी ठरली. या निवडणुकीत मनसे, आम आदमी पाटी, बहुजन समाज पार्टी, समाजवादी पार्टी, रासप या पक्षांना आपला एकही उमेदवार निवडून आणता आला नाही. तर अनेक पक्षांच्या उमेदवारांना आपली अनामत रक्कमही वाचवता आली नाही. त्यामुळे या निवडणुकीने भाजप आणि काँग्रेस पक्षसोडून सर्वच पक्षांना आत्मचिंतन करण्याचा धडा दिला, एवढे मात्र खरे.

# वरूर जवळका येथे प्रगट दिन महोत्सव

प्रतिनिधी २१ जानेवारी



**अकोट :** आकोट तालुक्यातील ओळखल्या जाणाऱ्या संत नगरी वरुर जऊळका येथील योग योगेश्वर संस्थान मध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज यांच्या प्रकट दिन महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. असून १ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी पर्यंत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व शिव महापुराण कथा होणार आहे.शिव महापुराण कथा वाचक ह.भ.प. श्री गणेश महाराज शेटे आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी व्यासपीठ नेतृत्व ह. भ.प.अवधूत महाराज पारसकर, रामदास महाराज जवंजाळ, वैभव महाराज वसू, विश्वनाथ महाराज गीते, विष्णुपंत कुपटे यांच्या उपस्थितीत होईल,त्याचप्रमाणे सप्ताहामध्ये दररोज संध्याकाळी महाराष्ट्रातील दिग्गज कीर्तनकार महाराज मंडळींचे कीर्तनाचे आयोजन केले आहे. यामध्ये रामकृष्ण महाराज अंबुसकर, भानुदास महाराज टाकळीकर, अतुल महाराज बोर्डे, नागेश महाराज आगलावे, विष्णू महाराज गावंडे ,मोहन महाराज मेतकर ,बाल कीर्तनकार कु. कृष्णाई पाटील लांजुळकर व ८ फेब्रुवारीला सकाळी श्रींच्या मूर्तीचा अभिषेक काल्याचे किर्तन, महाप्रसाद व श्रींच्या पादुका व मुखवटासह संन भव्य ग्रंथ दिंडी सोहळा राहील या सर्व कार्यक्रमाचा श्रींच्या भक्तांनी लाभ घ्यावा,असे आवाहन योग योगेश्वर संस्थान संस्थांचे अध्यक्ष ह.भ.प. श्री गणेश महाराज शेटे करण्यात आले आहे,

CLASSIFIED
अकोल्यात आता नव्याने सुरु
द पाटील फ्रुड सेंटर चायनिज
येथे तुम्हाला सर्व प्रकारचे चायनिज, नुडल्स, मनचुरियन्स राईस लालीपॅप मिळेल.
वेळः सायंकाळ ४ ते रात्री ११ वार्जपर्यंत
होमडिलीवर उपलब्ध आणि प्राईज फक्त ७० रुपयापासून सुरू , मग सर्वांनीच एकदा जाऊन आनंद घ्या!
-:आमचा पत्ता:-
पाटील फ्रुड सेंटर
बारा जोतिलिंग रोड जवळ करोटे ज्वेलर्स जठारपेठ चौक,अकोला
प्रतिक हिंगणकर
Mo. 7378444488

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK